बुलढाणा । शनिवार
२३ मार्च २०२४
■ वर्ष-१ ■ अंक-२२१
■ पृष्ठे-८ ■ किंमत-५ रु.
DAINIK MAHABHOOMI
dainikmahabhoomi@gmail.com

दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष


साधनाश्री
प्लॉटींग & कन्स्ट्रक्शनस्
बुलढाणा
बुलढाणा शहरात कुठेही प्लॉट/ घर / रो-हाऊस/ फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध.
गणेश जाधव
(कार्यकारी संचालक)
7385466666
ऑफीस पत्ता - श्री माऊली होमिओपॅथीक हॉस्पिटल (जुने) डॉ.लध्दड हॉस्पिटल जवळ, बुलढाणा

## थोडक्यात

### चहल मुख्यमंत्र्यांच्या दरबारी, अप्पर मुख्य सचिवपदी नियुक्ती

**मुंबई :** बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त इकबाल सिंह चहल यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ संपलेला होता. मात्र तरीही त्यांची बदली करण्यात आली नव्हती. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने शिंदे सरकारला पत्र पाठवत चहल यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ संपल्याची आठवण करून दिली होती. त्यानंतर अखेर १८ मार्च रोजी इकबाल सिंह चहल यांना पदावरून हटविण्यात आले होते. यानंतर आता त्यांची मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

### संजय राऊत यांच्या विरोधात निवडणूक आयोगात तक्रार

**मुंबई :** राज्यात सध्या लोकसभा निवडणुकांचे वारे वाहू लागले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने सर्वच पक्ष ताकदीने मैदानात उतरले असून राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी होताना दिसत आहेत. अशातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबद्दल केलेल्या एका व्यक्तव्यामुळे शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत हे अडचणीत आले असून भारतीय जनता पक्षाने संजय राऊतांविरोधात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

**कोर्टाने दिला निर्णय : मद्य घोटाळ्याचे मास्टरमाईंड असल्याचा युक्तिवाद**

# अरविंद केजरीवाल यांना सहा दिवसांची ईडी कोठडी

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

भ्रष्टाचाराच्या विरोधात आवाज उठवून, सत्ता काबीज करणाऱ्या केजरीवालांना भ्रष्टाचाराच्या आरोपातच ईडीने अटक केली. दिल्लीतल्या कथित दारु घोटाळा प्रकरणात ईडीने केजरीवालांना बेड्या ठोकल्या आहेत. त्यांना गुरुवारी रात्री ईडीने घरी जावून अटक केली. त्यानंतर त्यांना आज कोर्टात हजर करण्यात आले. कोर्टात ईडीकडून जोरदार युक्तिवाद करण्यात आला. ईडीकडून कोर्टात अरविंद केजरीवाल यांच्या मोठे आरोप करण्यात आले. अरविंद केजरीवाल यांच्या चौकशीसाठी त्यांची १० दिवसांची कोठडी मागितली. कोर्टाने ईडीची मागणी मान्य करत ६ दिवसांची ईडी कोठडी केजरीवालांना बजावली आहे.

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना ६ दिवसांची ईडी कोठडी सुनावण्यात आली आहे. दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू कोर्टाने केजरीवाल यांना २८ मार्चपर्यंत ईडी कोठडी सुनावली आहे. अरविंद केजरीवाल यांना ईडीकडून काल रात्री अटक करण्यात आली होती. कथिक मद्यविक्री घोटाळा प्रकरणी त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली होती. अरविंद केजरीवाल यांना रात्रभर ईडीच्या कार्यालयात राहावे लागले. त्यानंतर त्यांना आज दिल्लीतील राऊज एव्हेन्यू कोर्टात हजर करण्यात आले. कोर्टात दोन्ही बाजूने प्रचंड युक्तिवात करण्यात आला. न्यायाधीशांनी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला. ईडीच्या युक्तिवादात अरविंद केजरीवाल यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. ईडीकडून अरविंद केजरीवाल यांच्या १० दिवस कोठडीची मागणी करण्यात आली. पण अरविंद केजरीवाल यांच्या वकिलांनी ती मागणी फेटाळण्याची विनंती कोर्टापुढे केली. कोर्टाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर ईडी कोठडीबाबतचा निकाल काही काळासाठी राखून ठेवला. त्यानंतर कोर्टाचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. कोर्टाने अरविंद केजरीवाल यांना ६ दिवसांची ईडी कोठडी सुनावली आहे.

हा दिल्ली सरकार आणि आम आदमी पक्षासाठी मोठा झटका आहे. आता अरविंद केजरीवाल मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देतात का? ते देखील पाहणं महत्त्वाचे ठरणार आहे.



### काय म्हणाले केजरीवाल?

*दुसरीकडे, मी जेलमध्ये राहो की बाहेर, देशासाठी माझं जीवन समर्पित असल्याची प्रतिक्रिया केजरीवालांनी कोर्टरुममध्ये जात असताना दिली. केजरीवालांना अटक झाल्यानंतर आपच्या कार्यकर्त्यांनी आंदोलनही केले.*

### मुख्यमंत्री अटक होण्याची पहिलीच घटना

*ईडीने गुरुवारी रात्री केजरीवाल यांच्या सरकारी निवासस्थानावर छापा टाकून त्यांना अटक केली. रात्री उशिरा केजरीवाल यांच्या शासकीय निवासस्थानी सुमारे ४ तास चाललेल्या शोध मोहिमेनंतर ईडीचे पथक त्यांना सोबत घेऊन गेले. दारू घोटाळ्याप्रकरणी ईडीची ही १६वी अटक आहे. मुख्यमंत्र्यांना पदावर असताना अटक होण्याची ही पहिलीच घटना आहे.*

### ईडीचे कोर्टात केजरीवालांवर नेमके आरोप काय?

*मद्य घोटाळ्यातील अरविंद केजरीवाल मुख्य सूत्रधार आहेत. अरविंद केजरीवालांना निवडणुकीत फंड हवा होता. मद्य घोटाळा १०० नाही तर ६०० कोटींचा आहे. गोवा निवडणुकीत मद्य घोटाळ्याचा पैसा वापरला गेला. गोव्याच्या निवडणुकीत ४५ कोटी रुपये खर्च करण्यात आले. गोव्याला ४ मार्गांनी पैसे पाठवले, यासाठी हवालाचाही वापर झाला. केजरीवालांनी इतर नेत्यांशी मिळून हा कट रचला, असा आरोप ईडीने आपल्या युक्तिवादातून केजरीवालांवर केला.*

# इलेक्टोरल बाँड्समधून भाजपाला सर्वाधिक देणगी



**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय पक्षांना विविध कंपन्यांकडून इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून मिळालेल्या देणग्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे देशातील राजकारण ढवळून निघाले आहे. या इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून केंद्रातील सत्ताधारी भाजपाला सर्वाधिक देणग्या मिळाल्याने विरोधकांकडून भाजपावर जोरदार टीका केली जात आहे.

हैदराबादस्थित बांधकाम कंपनी मेघा इंजिनियरिंग अँड इंफ्रास्ट्रक्चर लिमिटेडने भाजपाला सर्वाधिक देणगी दिली आहे. मेघा इंजिनियरिंग अँड इंफ्रास्ट्रक्चर लिमिटेडने भाजपाला ५८४ कोटी रुपयांची देणगी दिल्याची माहिती समोर आली आहे. याच कंपनीच्या समुहातील कंपनी असलेल्या वेस्टर्न यूपी पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेडने ८० कोटी रुपयांची देणगी दिली आहे. या उद्योग समुहाने दोन्ही देणग्यांच्या माध्यमातून भाजपाला एकूण ६६४ कोटी रुपयांची देणगी दिली आहे. मुंबईस्थित क्विक सप्लाय चेन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने भाजपाला ३७५ कोटी रुपयांची देणगी दिली आहे. या कंपनीने इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून एकूण ४१० कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. भारती एअरटेल लिमिटेडने इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून १८३ कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. तर कोलकात्यामध्ये मुख्यालय असलेल्या मदनलाल लिमिटेडने १७५ कोटी आणि या समुहातील दुसरी कंपनी असलेल्या केवेंटर फूड पार्क इन्फ्रा लिमिटेडने बाँडच्या माध्यमातून १४४.५ कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. अशा प्रकारे या समुहाने एकूण ३२० कोटी रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत.

# चांद्रयान मोहीमेपासून माँ तुझे सलाम!

**आयपीएलच्या उद्घाटन सोहळ्यात 'नया भारत'ची झलक**



**चेन्नई, वृत्तसंस्था :**

चेन्नईच्या चेपॉक स्टेडियममध्ये आयपीएल २०२४ चा उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात बॉलिवूडमधील अनेक बड्या व्यक्तींनी हजेरी लावली होती. चांद्रयान मोहीमेपासून माँ तुझे सलामनेही चाहत्यांचे लक्ष वेधले.

आयपीएल २०२४ च्या उद्घाटन सोहळ्याला बॉलीवूडचे कलाकार आणि गायकांनी उपस्थिती लावत चार चाँद लावले. मात्र याचवेळी उद्घाटन सोहळ्यावेळी चांद्रयान मोहीमेच्या देखाव्याला देखील विशेष स्थान देण्यात आले होते. याचबरोबर सोनू निगम आणि एआर रहमान यांनी माँ तुझे सलाम हे गाणे सादर करत चाहत्यांना मंत्रमुग्ध केले. आयपीएलच्या उद्घाटन सोहळ्याकडे पाहून या कार्यक्रमाद्वारे नया भारतची झलक दाखवण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट जाणवत होते.

आयपीएलच्या उद्घाटन सोहळ्यात चांद्रयान मोहीमेचे ॲनिमेशन देखील दाखवण्यात आले. त्याचबरोबर गाण्यांच्या कार्यक्रमात देशभक्तीपर गाण्यांची संख्या देखील जास्त होती. आयपीएलच्या उद्घाटन सोहळ्याची सुरूवात अक्षय कुमार आणि तिरंग्याने झाली होती.

अक्षय कुमार तिरंगा हातात घेऊन मैदानावर आला. त्यानंतर टायर श्रॉफ देखील स्टेजवर आला. या दोघांनी देशभक्तीपर गाण्यांवर आपली अदाकारी सादर केली. त्यानंतर साँगवर हे दोघे थिरकले.

# भाजप उमेदवारांची चौथी यादी जाहीर

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने गुरुवारी नऊ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली होती. त्यानंतर शुक्रवारी भाजपने चौथी यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये तामिळनाडूतील आणि पुद्दुचेरीतील एका उमेदवाराचा समावेश आहे. तिसऱ्या आणि चौथ्या दोन्ही यादीत भाजपने प्रामुख्याने दक्षिण भारतातील जागांवरील उमेदवारांची घोषणा केली आहे.

सात टप्प्यात होणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये तामिळनाडू आणि पुद्दुचेरीमध्ये पहिल्या टप्प्यात म्हणजेच १९ एप्रिलला मतदान होणार आहे. पुद्दुचेरी लोकसभा जागेवर भाजपने



ए. नमशिवयम यांना उमेदवारी दिली आहे. ही जागा सध्या कॉंग्रेसकडे आहे. भाजपच्या तिसऱ्या यादीत तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष के अन्नामलाई यांना कोईम्बतूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली. तर तेलंगाणाच्या राज्यपालपदाचा राजिनामा देणाऱ्या तमिलिसाई सुंदरराजन यांना चेन्नई दक्षिणमधून उमेदवारी दिली. त्यांच्याकडे पुद्दूचेरीच्या नायब राज्यपालपदाचीही जबाबदारी होती.

# भारताच्या पुष्पक विमानाचे यशस्वी प्रक्षेपण

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच इस्त्रोने शुक्रवारी कर्नाटकातील चित्रदुर्ग येथील एरोनॉटिकल टेस्ट रेंजमधून 'पुष्पक' विमानाचे यशस्वी प्रक्षेपण केले. प्रक्षेपणानंतर विमानाचे यशस्वी लँडिंग देखील झाले.

इस्त्रोने आज सकाळी सात वाजता कर्नाटकातील चित्रदुर्ग येथील एरोनॉटिकल टेस्ट रेंज (एटीआर) येथे यशस्वीरित्या ही चाचणी पूर्ण केली. आरएलव्ही-टीडी उड्डाण आणि लँडिंगचे प्रयोग २०१६ आणि २०२३ मध्ये करण्यात आले. भारताचा हा मोठा प्रयत्न आहे. त्याचा वरचा भाग सर्वात महाग आहे. यात महागडी इलेक्ट्रॉनिक्स वस्तू



असल्याचे बोलले जात आहे. भारत अंतराळातील मलबा कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. पुष्पक विमान हे या दिशेने उचललेले पाऊल आहे. इस्त्रोच्या म्हणण्यानुसार, ही मोहीम अंतराळ संस्थेच्या "पूर्णपणे पुन्हा वापरण्यायोग्य प्रक्षेपण यानासाठी आवश्यक तंत्रज्ञान विकसित करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग आहे जेणेकरून अंतराळात कमी खर्चात प्रवेश करता येईल". फेब्रुवारी महिन्यात सोमनाथ यांनी त्रिवेंद्रम येथील विक्रम साराभाई अंतराळ केंद्राला भेट देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आरएलव्ही मोहिमेची माहिती दिली होती.

# लोकसभेची चर्चा फिस्कटली; ओडिशामध्ये भाजप आणि बीजेडीची युती नाही

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

भुवनेश्वर आणि दिल्लीमध्ये झालेल्या अनेक चर्चा झाल्यानंतर ओडिशामध्ये बीजेडी आणि भाजपने युती न करण्याचा निर्णय घेतला आहे. ओडिशा भाजप प्रदेशाध्यक्ष मनमोहन सामल यांनी २१ लोकसभा मतदारसंघ आणि १४७ विधानसभेच्या जागा भाजप स्वबळावर लढेल, अशी घोषणा केली.

सामल यांनी नवीन पटनायक यांच्या नेतृत्वाखालील बीजेडीचे केंद्रातील भाजप सरकारला महत्त्वाच्या क्षणी पाठिंबा दिल्याबद्दल आभार मानले, परंतु ओडिया लोकांच्या हितसंबंधित अनेक मुद्द्यांवर भाजप बीजेडी सरकारशी सहमत नाही, असे सांगितले. बीजेडीकडून सामल यांच्या विधानावर शुक्रवारी संध्याकाळपर्यंत कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आली नसली तरी पक्षाच्या नेत्यांनी सांगितले की ते स्वबळावर लढण्यास तयार आहेत. भाजप आणि बीजेडीच्या विधानसभेच्या जागावाटपाच्या मुद्द्यावरून बोलणी फिस्कटली. बीजेडीला १४७ पैकी १०० पेक्षा कमी विधानसभेच्या जागांवर निवडणूक लढवायची नव्हती, ज्या राज्यात त्यांची उपस्थिती आहे. मात्र भाजपने जवळपास ५७ जागांवर आग्रह धरला. निवडणुकीनंतरच्या सत्तेच्या वाटणीच्या सूत्रावरही पक्षांचे एकमत होऊ शकले नाही. बीजेडीच्या काही बंडखोर नेत्यांना निवडणुकीत उतरवण्याची भाजपची योजनाही बीजेडीला फारशी पटली नाही.

### काय म्हणाले सामल?

*भाजप "राज्यातील ४.५ कोटी लोकांच्या आशा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली लढेल". सामल म्हणाले की "डबल-इंजिन सरकारे" असलेल्या सर्व राज्यांमध्ये विकास आणि कल्याणात वाढ झाली आहे.*

# मुख्याध्यापिकेचे विद्यार्थ्याशी अश्लील चाळे; गुन्हा दाखल

**शेगाव/प्रतिनिधी**

शाळेत विद्यार्थ्यांना केळी वाटपा दरम्यान एका विद्यार्थ्याने खराब केळी दिल्याची तक्रार पालकाकडे केली. त्यामुळे पालकाने मुख्याध्यापिकेला जाब विचारल्याचा राग धरून मुख्याध्यापिकेने आठ वर्षीय विद्यार्थ्यासोबत अश्लील चाळे केल्याप्रकरणी पालकाच्या तक्रारीवरून पोलिसांनी मुख्याध्यापिकेविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे जिल्हा परिषद शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली आहे.

शेगाव तालुक्यातील एका जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेमध्ये १५ मार्च रोजी केळीचे वाटप करण्यात आले होते. दरम्यान शाळेतील एका विद्यार्थ्याला खराब केळी मिळाल्याने त्याने याबाबत त्याच्या वडिलांना सांगितले. त्यामुळे वडिलांनी मुख्याध्यापिकेला मुलाला खराब केळी का दिली? असा जाब विचारून चांगलेच झापले. हा राग मनात ठेवून २१ मार्च रोजी पीडित विद्यार्थ्याला माझ्याबद्दल तक्रार करतो का, माझी बदली करायला लावतो का असे म्हणत विद्यार्थ्यासोबत अश्लील चाळे केले. त्यामुळे घाबरून विद्यार्थी शाळेमधून पळत सुटला.

दरम्यान पळता पळता तो शाळेच्या आवारात पडल्याने त्याच्या पायाला मार लागून तो जखमी झाला. घडलेले कृत्य पीडित विद्यार्थ्याने त्याच्या वडिलांना सांगितले. याप्रकरणी पीडित विद्यार्थ्यांच्या वडिलांनी शेगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला तक्रार दिली असून तक्रारीवरून पोलिसांनी मुख्याध्यापिकेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

**महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपावरुन तिढा..**

# नऊ मतदारसंघांवर शरद पवार गटाचे शिक्कामोर्तब

**मुंबई, वृत्तसंस्था :**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी सध्या महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये जागावाटपांवरुन तिढा सुरु आहे. आपल्या पक्षाला जास्तीत जास्त जागा मिळाव्यात, यासाठी प्रत्येक पक्ष प्रयत्न करत आहे. दरम्यान महाविकास आघाडीत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला एकूण ९ जागा मिळण्याची शक्यता आहे. वंचित मविआमध्ये सहभागी झाला तरी शरद पवार गट ९ जागा लढवण्यावर ठाम असल्याची सूत्रांची माहिती आहे.

शरद पवारांच्या राष्ट्रवादीला सातारा, माढा, बारामती, बीड, वर्धा, शिरूर, रावेर, दिंडोरी, भिवंडी हे ९ मतदारसंघ मिळू शकतात. या ९ मतदारसंघात शरद पवार गटाचे उमेदवार निवडणूक लढण्याची शक्यता आहे. दरम्यान, शरद पवारही निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच त्यांनी निवडणूक लढावी असा आग्रह देखील होत आहे. पुणे, सातारा किंवा माढा मतदारसंघातून ते उतरावेत, अशी इच्छा व्यक्त केली जात आहे. पण शरद पवारांनी आपण निवडणूक लढणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. आपण माढातून निवडणूक लढवणार नाही, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले. मी यापुढे कधीच निवडणूक लढवणार नाही असे शरद पवार म्हणाले आहेत. मला कार्यकर्ते पुणे, सातारा किंवा माढामधून निवडणूक लढण्यास सांगत होते अशी माहिती शरद पवारांनी दिली होती. यानंतर आज शरद पवारांनीच आपण निवडणूक लढणार नसल्याचे स्पष्ट केले. तुम्ही निवडणूक लढणार का? असं विचारलं असता त्यांनी आपण कोणतीच निवडणूक लढवणार नसल्याचं सांगितलं. "राजकीय आयुष्यात मी १४ निवडणुका लढलो आहे. या सर्व निवडणुका मी जिंकलो आहे. आता आणखी निवडणूक लढवण्याची आपली इच्छा नाही," असं ते म्हणाले.



### जागा आणि संभाव्य उमेदवार

- *बारामती- सुप्रिया सुळे*
- *माढा-महादेव जानकर(रासप)*
- *सातारा- श्रीनिवास पाटील*
- *शिरुर-अमोल कोल्हे*
- *नगर दक्षिण-निलेश लंके*
- *बीड-बजरंग सोनवणे किंवा ज्योती मेटे*
- *वर्धा-अमर काळे*
- *दिंडोरी- (अनिश्चित)*
- *रावेर - (अनिश्चित)*

# २४ तारखेला निर्णायक भूमिका; मनोज जरांगे पाटील यांचा एल्गार

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

गृहमंत्री स्वत:ला सर्वोच्च न्यायालयाच्या वर समजत असतील. ही सत्ता मराठ्यांनी दिली असली तरी मराठ्यांवरच अन्याय करू शकतो, असे त्यांना वाटत असेल. या सत्तेचा वापर करून मराठ्यांना चिरडण्याचा प्रयत्न ते करत आहेत. देशभरात मोठ्या जातींना पायाखाली चिरडण्याचा प्रयत्न यांनी केला आहे. पण जर सर्व मोठ्या जाती एकत्र आल्या तर यांचा राजकीय सुपडा साफ होईल, असा स्पष्ट इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

दरम्यान, २४ तारखेला निर्णायक भूमिका घेणार आहे. १५ ते १६ विषय आहेत. गेल्या ७० वर्षांतील सगळ्या गोष्टी असणार आहेत, असेही मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले की, मला रात्री माहिती मिळाली की,



माझ्याविरोधात आणखी १० ते १५ केसेस करायच्या आणि मला तडीपार करण्याच्या ऑर्डर काढायच्या. गृहमंत्रीसाहेब स्वप्न बघायचे कमी करा. तडीपार करण्याचा प्रयत्न करायचा, क्लिप व्हायरल करायची. मराठा समाज विरोधात गेला आणि आता इतर समाजही विरोधात चालला आहे, या शब्दांत मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा एल्गार केला.

मीडियाशी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्याचे गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर घणाघाती टीका केली.

## थोडक्यात

### शनिवारी मिलिंद सामाजिक कृतज्ञता पुरस्कार प्रदान सोहळा

**छत्रपती संभाजीनगर :** मिलिंद कला महाविद्यालयाच्यावतीने देण्यात येणारा यावर्षीचा मिलिंद सामाजिक कृतज्ञता पुरस्कार दलित पॅंथरचे सहसंस्थापक आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ लेखक व विचारवंत अर्जुन डांगळे यांना शनिवारीप्रदान करण्यात येणार आहे. नामांतर दिनी चौथा मिलिंद सामाजिक कृतज्ञता पुरस्कार आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ लेखक व विचारवंत अर्जुन डांगळे यांना देण्याचे महाविद्यलयाच्या वतीने जाहिर करण्यात आले होते. त्यानुसार मिलिंद कला महाविद्यालयात सायंकाळी सहा वाजता आयोजित एका विशेष समारंभात आंबेडकरी विचावंत अर्जुन डांगळे यांना मिलिंद सामाजिक कृतज्ञता पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

### पाणीमिश्रीत पेट्रोलची विक्री; कारवाईसाठी चालढकल..

**छत्रपती संभाजीनगर :** सिडको एन- ७, पी सेक्टर येथील रिलायन्स पेट्रोल पंपावर पाणीमिश्रित पेट्रोल विक्री केल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही शासनाकडून कारवाईसाठी चालढकल करण्यात आली. त्यामुळे तक्रारदाराने थेट खंडपीठात धाव घेतली असता न्यायमूर्ती शैलेश ब्रह्मे आणि न्यायमूर्ती मंगेश पाटील यांनी अन्न व नागरी पुरवठा विभाग, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि रिलायन्स जिओ पेट्रोलियमच्या विभागीय व्यवस्थापकांना नोटीस बजावण्याचे आदेश दिले.

### निधन वार्ता

#### वंदना महामुने

**जाफ्राबाद :** पोखरी येथील रहिवासी तथा माजी सरपंच वंदना दिगंबर महामुने यांचे २१ मार्च रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ वर्ष होते. त्या डिंगाबर महामुने (सेवानिवृत्त शिक्षक) यांच्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंड असा मोठा आप्त परिवार आहे.




# भूकंपमापन केंद्रातील भूकंपमापक यंत्र बंद!

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत गुरुवारी भूकंपाचे हादरे बसले. कोठेही भूकंप झाल्यास त्याची नोंद घेणारे व विशेष बाब म्हणून जायकवाडी धरणाच्या (नाथसागर) सुरक्षिततेसाठी बसविण्यात आलेल्या भूकंपमापन केंद्रातील भूकंपमापक बंद आहे. धक्कादायक बाब म्हणचे चार वर्षांपासून या केंद्रातील भूकंपमापन यंत्रच कालबाह्य झाल्याने त्यात कोणत्याही नोंदी होत नाहीत. त्यामुळे आशिया खंडातील सर्वात मोठे मातीचे धरण असलेल्या नाथसागराच्या सुरक्षेच्या दृष्टीने या ठिकाणी अत्याधुनिक भूकंपमापन यंत्र बसविण्यात यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

नाथसागर धरणावर १९९४ मध्ये भूकंपमापन यंत्र बसविण्यात आले. यामध्ये हाताने या यंत्रातील कागद बदलणे, यंत्राद्वारे निघालेल्या आलेखावरून किती रिश्टर स्केलचा भूकंप झाला, याचा निष्कर्ष काढला जातो. आज या यंत्रास ३० वर्षे झाली. अनेक नवनवीन तंत्रज्ञान आले, मात्र येथे अनेक वर्षे हे जुनेच यंत्र वापरण्यात येत होते. त्यात हे यंत्र अनेकवेळा बंदही पडले होते. भूकंप झाल्यावर हे यंत्र बंद पडल्यास इतर कार्यालयांकडून माहिती घेऊन भूकंपाचे गणित मांडले जात होते. हे यंत्र जुनाट झाले. त्याचबरोबर काही वर्षांपासून याठिकाणी प्रशिक्षित कर्मचारी नव्हते. दरम्यान, आता नवीन भूकंपमापन यंत्र या केंद्रात बसविण्यात येणार असल्याची माहिती धरणाचे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव यांनी दिली.


(संग्रहित चित्र)

**अमेरिकन यंत्राची किंमत ७ लाख..**

*२० डिसेंबर २०१७ रोजी हे यंत्र बंद पडले असून, आता या घटनेला सात वर्षे झाली आहेत. अमेरिकेत निर्मित 'एमईक्यू-८८० अर्थक्वेक' या कंपनीचे हे यंत्र होते. ता. १५ नोव्हेंबर १९९४ मध्ये बसविण्यात आलेल्या भूकंपमापन यंत्राची किंमत त्यावेळी साडेसात लाख रुपये होती. धरणामागील जलक्षेत्राच्या भागात भूकंपमापन केंद्र आहे. यंत्रात बिघाड झाल्यामुळे कार्यकारी अभियंता व दगडी धरण सहायक अभियंत्यांनी केंद्रातील या यंत्राला दुरुस्तीसाठी नाशिक येथील महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेत पाठविले.*

# मोकाट श्वानांच्या निर्बिजीकरणावर भर द्या : खंडपीठाचे मनपाला आदेश

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी



शहरात मोकाट श्वान दररोज ८ ते १० नागारिकांचे लचके तोडतात. केवळ २०१९-२०२२ या चार वर्षात ११०६४ नागरिकांचे श्वानांनी लचके तोडल्याची नोंद महापालिकेकडे आहे. नोंद नसलेली अनेक उदाहरणे आहेत. याची दखल घेत दाखल जनहित याचिकेवर खंडपीठात आज गुरुवारी सुनावणी झाली. मोकाट श्वानांच्या निर्बिजीकरणावर भर द्या, त्यांच्या स्मशानभूमीसाठी काही व्यवस्था करता येईल का? यासंदर्भात उपाययोजना करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर येथील खंडपीठाचे न्यायमूर्ती रवींद्र घुगे व न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांनी दिले आहेत.

शहरातील मोकाट श्वानांच्या बाबतीत ॲड. संकेत सूर्यवंशी, ॲड. सुशांत दीक्षित यांनी याचिका दाखल केली आहे. प्राणी जन्म नियंत्रण नियम २०२३ महापालिकेने कुठली पाऊले उचलली यासंबंधीची माहिती द्यावी अशी विनंती याचिकेत करण्यात आली आहे. महापालिकेने निवासी वसाहती, शाळा, सार्वजनिक ठिकाणे आदींमध्ये भटक्या श्वानांना प्रवेशापासून रोखण्यासाठी उपाययोजना कराव्यात. भटक्या श्वानांसाठी निवारा गृहांची स्थापना करावी. रात्रीच्या वेळी श्वानांवर प्रतिबंध घालण्यासाठी एखाद्या संस्थेची नेमणूक करून त्यावर नियंत्रणाच्या उपाययोजना केल्या जाव्यात. श्वानांना पकडण्यासाठी महापालिकेच्या वतीने फिरते वाहन पथक नियुक्ती करून पथकांची संख्या वाढवावी आणि मदत केंद्र स्थापन करावे. श्वानांच्या तक्रारीसाठी मदत केंद्राची सुरूवात करावी. मोकाट श्वानांना कसे हाताळले जावे आणि त्यापासून संरक्षण करण्यासाठी नागरिकांनी प्रथमदर्शनी काय काळजी घ्यावी यासाठी कार्यशाळा घ्यावी अशी विनंती याचिकेत करण्यात आली होती.

दाखल याचिका आज गुरुवारी सुनावणीस निघाली असता न्यायालयाने याचिकाकर्त्यांची बाजू ऐकून घेतली. मोकाट श्वानास पकडण्यासाठी अत्याधुनिक नेट गणचा वापर करण्यात येत असल्याचे मनपाकडून सांगण्यात आले. त्यानंतर न्यायालयाने मृत पावणार्या श्वानांच्या स्मशानभूमीसाठी काही करता येईल का?, नागरिकांकडे असणार्या श्वानांची नोंदणी करण्यासाठी जनजागृती करता येईल का? अशी विचारणा मनपाला केली. महापालिकेच्या वतीने ॲड. संभाजी टोपे, शासनातर्फे ॲड. अमजीतसिंह गिरासे यांनी काम पाहिले.

# साडेअकरा महिन्यांत ६५२ कोटींवर महसूल जमा

## ३१ मार्च पूर्वीच मालमत्तेच्या नोंदीसाठी कार्यालयात वाढली गर्दी

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

मालमत्तांची खरेदी-विक्री करताना मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क भरणामध्ये गेल्या अकरा साडेअकरा महिन्यात जोरदार वाढ झाली आहे. विविध दस्त नोंदणीतून मुद्रांक आणि नोंदणी विभागाला मालामाल केले असून जिल्ह्यातून तब्बल ६५२ कोटी ५३ लाख रुपयांचा महसुल प्राप्त झाला आहे. दिलेल्या उद्दिष्टच्या तुलनेत हे प्रमाण ८७ टक्के एवढे आहे. दरम्यान, रेडीरेकनरच्या दरात वाढ होण्याची शक्यता गृहीत धरुन ३१ मार्च पूर्वीच मालमत्ते व्यवहारासंदर्भातील नोंद व्हावी, यासाठी नोंदणी कार्यालयात गेल्या काही दिवसापासून गर्दी वाढल्याचे चित्र आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात तीन आणि बीड बायपास भागात दोन अशी शहरात पाच नोंदणी कार्यालय आहे. यासह जिल्ह्यातील महत्वाच्या ठिकाणी मुद्रांक आणि नोंदणी विभागचे कार्यालय आहे.

शासनाने २०२३-२४ या वर्षासाठी येथील नोंदणी विभागास ७५० कोटी रुपये महसूल वसुलीचे उद्दिष्ट दिले होते. त्यापैकी १ एप्रिल २०२३ ते १५ मार्च २०२४ या कालवधीत ६५२ कोटी ५३ लाख रुपयांचा महसूल शासन तिजोरीत जमा करण्यात आला आहे. दिलेल्या उद्दिष्टच्या तुलनेत हे प्रमाण ८७ टक्के एवढे आहे. मालमत्ता खरेदी विक्रीचे व्यवहार वाढले. यात दसरा, दिवाळी सणांच्या दरम्यान रिअल इस्टेट क्षेत्रातही चांगला प्रतिसाद मिळाला. यासह जमिनीचे अन्य व्यवहार आदी कारणांमुळे आतापर्यंत ८७ हजार १९७ विविध प्रकारच्या दस्त नोंदणी झाल्या आहेत.

यात फेब्रुवारी २०२४ अखेरपर्यंत ७७ हजार ७४० दस्त नोंदण्या झाल्या होत्या. तर मार्च महिन्यात १५ तारखेपर्यंत ९ हजार ४५७ विविध प्रकारच्या दस्त नोंदण्या झाल्या आहे. सर्व कर्मचार्यांच्या मेहनतीमुळे शासनाच्या तिजोरीत चांगलीच भर पडत असल्याचे मुद्रांक जिल्हाधिकारी विवेक गांगुर्डे यांनी सांगत दिलेल्या उद्दिष्ट मार्च अखेरपर्यंत निश्चित पुर्ण होईल, असा विश्वास व्यक्त केला.

दरम्यान, दरवर्षी १ एप्रिल रोजी रेडीरेकनर (मूल्य तक्तादर) दर जाहीर केले जातात. या दरावरूनच मुद्रांक शुल्काची आकारणी केली जाते. यंदाही दरात वाढ होईल, अशी चर्चा आहे. परिणामी, ३१ मार्च आधी विविध प्रकारच्या नोंदणी करण्यासाठी नागरिकांची नोंदणी कार्यालयात गेल्या काही दिवसापासून गर्दी वाढल्याचे चित्र आहे.

# पान्हेरा ते श्री क्षेत्र पैठण पायी दिंडीचे वालसा वडाळा येथे स्वागत

वालसा वडाळा/भोकरदन

तालुक्यातील श्री क्षेत्र वालसा वडाळा येथे २१ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता गावातील महिला मंडळ पुरुष मंडळीनी पायी दिंडीचे भव्य स्वागत करून २२ मार्च रोजी सकाळी गावतून पालखी मिरवणूक काढण्यात आली.

या दिंडीचे ३३ वे वर्ष आहे. या दिंडीचे मार्गदर्शक हरी भक्त गुरुवर्य सुभाष महाराज पवार, दिंडी चालक हरी भक्त श्रीरंग महाराज मोहिते,हरी भक्त काशीनाथ महाराज चव्हाण,हरी भक्त सखाराम महाराज मोहिते, आदिशक्ती कान्हुसती माता देवस्थान पान्हेरा खेडी ते श्री क्षेत्र पैठणच्या दिशेने १८ मार्च रोजी दुपारी २ वाजता निघाली.यां दिंडीचे १६ मुक्काम होतात. या दिंडीत महिला पुरुष लहान मुले २०० भक्त सहभागी असतात. या दिंडी चा २५० किलोमीटर चा प्रवास हे हरी नामाच्या गजरात पार केला जातो. गावातील महिला मंडळनी अंगात सडा रांगोळी काढून मनु देवीची आरती करून पुढील मुक्कामासाठी वालसा वडाळा गावातुन निघाले, तसेच श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर संस्थान तर्फे दिंडी रहाण्याची व भोजनाची व्यवस्था श्री संस्थान तर्फे करण्यात आली. यावेळी उपस्थित गावातील विजय बोडखे, मारोती राऊत, विकास राऊत, गजानन बोडखे, गजानन ताडे, नागेश आसरे, शंकर पोट यांनी सहकार्य केले.

## 'मतदार जागृतीसाठी महिलांनी पुढाकार घ्यावा'

**छत्रपती संभाजीनगर :** आपल्या जिल्ह्यातच नव्हे तर देशातही ५० टक्के मतदार महिला आहेत. मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी तसेच लोकांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविण्यासाठी महिलांनी स्वतः मतदान व मतदार जागृतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांनी २१ मार्चला पैठण येथे केले.

# पाच वर्षीय मुलीला भरधाव ट्रकने उडविले

करमाड/प्रतिनिधी

लाडसावंगी रस्त्यावर मुरूम भरून जाणाऱ्या भरधाव ट्रकने रस्ता ओलांडणाऱ्या पाच वर्षीय मुलीला धडक दिली. छत्रपती संभाजी नगरातील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असताना मुलीचा मृत्यू झाला. ही घटना २१ मार्च रोजी दुपारी तीन वाजता भांबरडा गावाजवळ घडली. कोमल सुनील भिसे रा.भांबर्डे असे मृतक मुलीचे नाव आहे.

आईसोबत लाडसावंगी येथील दवाखान्यातून उपचार घेऊन घरी परतत असताना भांबर्डे गावाजवळ गाडीतून ती खाली उतरली. रस्ता ओलांडताना लाडसावंगीकडून करमाडकडे वेगाने येणाऱ्या ट्रक (क्रमांक एम.एच २० एल ९३२७) ने तिला जोरदार धडक दिली.

चकाखाली येऊन चिरडल्याने मुलीचे दोन्ही पाय निकामी झाले. हा अपघात गावाजवळ झाल्याने ग्रामस्थांनी घटनास्थळ गाठून मुलीला छत्रपती संभाजी नगरला हलवले. उपचार सुरू असताना मुलीचा सायंकाळी सहा वाजता मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रक चालक गाडी सोडून फरार झाला. माहिती मिळतात करमाड पोलीस घटनास्थळी दाखल झाले ग्रामस्थ आक्रमक झाल्याचे पाहून पोलिसांनी मोठा फॉल्स फाटा तैनात केला होता. या घटनेतील ट्रक पोलिसांनी ताब्यात घेतला.




### राशीभविष्य

- **मेष :** मौजमजेवर नियंत्रण ठेवणं आवश्यक. कायद्याची चौकट पाळा. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक टाळा.
- **वृषभ :** नव्या उद्योग व्यवसायात जम बसेल. गंगाजळी वाढती राहील. रखडलेली कामं मार्गी लागतील.
- **मिथुन :** कोणत्याही गोष्टीचा अतिरेक टाळा. खाजगी बाबी खाजगीच ठेवा. जुगार,सट्ट्यापासून दूर रहा.
- **कर्क :** जोडीदाराचे गैरसमज दूर कराल. घरात समाधानी वातावरण राहील. संतती प्रगतीपथावर असेल.
- **सिंह :** कोणताही व्यवहार करताना दक्ष राहावं. अनोळखी माणसावर विश्वास ठेऊ नका. प्रवासात जपा.
- **कन्या :** मित्रांच्या सहकार्याने अडचणी सुटतील. आर्थिक अडचणीत जेष्ठ मदत करतील. प्रवास घडेल.
- **तूळ :** नातेवाईकांशी पैशाचे व्यवहार जपून करा. कलागुणांना वाव मिळेल. चोरांपासून सावध असावं.
- **वृश्चिक :** नवीन कामं मनासारखी मिळतील. आर्थिक गुंता सुटेल. कामात आत्मविश्वास, हुरूप वाढेल.
- **धनु :** प्रकृतीबाबत तक्रारी वाढतील. नवीन जबाबदारी स्वीकारू नका. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील.
- **मकर :** नावलौकिकात वाढ होईल. नव्या ओळखीतून लाभ होईल. कमी श्रमात अधिक फायदा होईल.
- **कुंभ :** मानसिक क्लेशात वाढ होईल. आर्थिक चित्र चिंताजनक राहील. कामाचं वेळापत्रक बिघडेल.
- **मीन :** प्रगतीतील अडथळे संपुष्टात येतील. गाठीभेटीचे योग येतील. आवडीच्या क्षेत्रात वेळ घालवाल.

### सल्ला मोलाचा — त्वचेची महत्त्वाची भूमिका

त्वचेमुळे घातक जंतूंपासून शरीराच्या आतील भागांचं रक्षण होतं. त्वचेच्या खालच्या थरातील नाजूक टिश्यूंच्या रक्षणाची जबाबदारीही त्वचेची असते. शरीराचं तापमान नियंत्रित ठेवण्यातही त्वचा महत्त्वाची भूमिका बजावते. ✻ उष्ण तापमान असेल तर त्वचेच्या ग्रंथी घाम साचवून ठेवतात. या घामाचं बाष्पीभवन झाल्यानं आपल्या शरीराचं तापमान उन्हाळ्यात नियंत्रित राहतं तर थंड वातावरणात त्वचेतल्या रक्तवाहिन्या आकुंचन पावल्यानं शरीराच्या पृष्ठभागाकडे जाणाऱ्या रक्तप्रवाहाची गती कमी होते. यामुळे शरीरातली उष्णता टिकून राहण्यास मदत होते. ✻ त्वचेच्या लगत लहान आकाराच्या लाखो शिरा असतात. या शिरांमुळे आपल्याला स्पर्शाची तसेच वेदनेची जाणीव होते. ✻ शरीराची 'ड' जीवनसत्त्वाची बरीचशी गरज त्वचेकडूनच भागवली जाते. त्वचा सूर्यप्रकाश शोषून घेते आणि त्यापासून ड जीवनसत्त्वाची निर्मिती करते. ✻ आपल्या ओठांवरचा त्वचेचा थर सर्वात पातळ असतो तर टाळू, पंजा आणि टाचेवरची त्वचा शरीराच्या इतर कोणत्याही भागापेक्षा जाड असते.

### दिनविशेष — २३ मार्च


- **२०१४ :** बेपत्ता मलेशियन एअरलाईन्सचे विमान हिंद महासागरात कोसळल्याची खात्रीशीर माहिती.
- **२०१६ :** मोठ्या बॉबस्फोटांच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ब्रुसेल्स दौरा वेळापत्रकानुसारचं पार पडणार असल्याचं जाहीर.
- **२०१७ :** केंद्र सरकारने 'राष्ट्रीय मागासवर्ग आयोग' रद्द करून आरक्षणासाठी नवा आयोग आणण्याचा निर्णय घेतला.
- **२०१८ :** आयएनएक्स मीडिया प्रकरणात कार्ति चिदंबरमला जामीन मंजूर.

### महत्त्वपूर्ण काही... — प्रवाहातील अनोखी बेटं

बेटांविषयी साऱ्यांनाच आकर्षण वाटत असतं. चारही बाजूने पाणी आणि मध्ये जमिनीचा तुकडा या भौगोलिक स्थितीला बेट म्हणतात. आजूबाजूला खारं पाणी असूनही या बेटांवर मात्र गोड पाण्याचे झरे सापडतात. तिथे बऱ्याच प्राणी-पक्ष्यांचा वावर असतो. विपूल वनसंपदा असते. पण 'द थाऊजंड आयलंड्स' नावानं ओळखला जाणारा परिसर काहीसा भिन्न आहे. या परिसरात तब्बल १८६४ बेटं पहायला मिळतात. सेंट लॉरेन्स नदीच्या प्रवाहात ही बेटं आहेत. केप व्हिनसेंट आणि ॲलेक्झॅड्रिया बेच्या दरम्यान वाहणाऱ्या प्रवाहात ही बेटं तयार झाली आहेत. यातील एखादं बेट चाळीस स्क्वेअर मैलाचं आहे तर एखादं बेटं इतकं छोटं की त्यावर केवळ एकच घर बांधता येईल. खडकाचा एखादा भाग बाहेर आल्यामुळे तयार झालेलं हे बेट आहे. आश्चर्याची बाब म्हणजे यातील बहुतांश बेटांवर माणसं राहतात. आपण शेजारी शेजारी घरं बाधून राहतो त्याप्रमाणे तसे लोक या जवळजवळच्या बेटांवर घरं बांधतात. साहजिक प्रवासासाठी त्यांना बोटीचाच आधार घ्यावा लागतो.

### जपा आरोग्य — मोतीबिंदू शस्त्रक्रियेविषयी...

वृद्धापकाळात उद्भवणारा मोतीबिंदू हा विकार डोळ्यांना झालेल्या इजेची परिणतीही असू शकतो. डोळ्यांवर जंबूपार म्हणजेच अल्ट्राव्हायोलेट किरणांचा मारा झाला असेल तर मोतीबिंदू होऊ शकतो. काही वेळा जनुकांमधील दोषांमुळे उपजतच मोतीबिंदू झालेला असतो. जन्माच्या वेळी त्याची व्याप्ती फारशी नसते; पण पुढं त्याची वाढ होऊन भिंग काम करेनासं होतं. मधुमेहाची बाधा झाली असेल किंवा अतिरेकी धूम्रपान होत असेल तरी मोतीबिंदू होण्याची शक्यता वाढीस लागते. यावर उपाय करताना डोळ्यातलं ते गढुळलेलं भिंग काढून टाकणं आवश्यक असतं.



पूर्वीच्या काळी मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेत हेच केलं जात असे. पण हे करताना प्रकाशाचा पडद्यापर्यंतच्या प्रवासात येणारा अडथळा दूर होत असला तरी तो प्रकाश केंद्रित करण्याचं काम होऊ शकत नसे. त्यामुळे मग बाहेरून जाड भिंगाचा चष्मा देऊन ती त्रुटी नाहीशी करावी लागत असे. परंतु सध्या शस्त्रक्रियेने काढून टाकलेल्या भिंगाच्या जागी कृत्रिम भिंग बसवता येतं. डोळ्याच्या आकारानुसार तसंच इतर गुणधर्मांनुसार योग्य ते भिंग निवडता येतं. गढुळलेलं भिंग काढून टाकण्याची शस्त्रक्रिया करतानाच या कृत्रिम भिंगाचं रोपण केलं जातं. ते स्वयंचलितरित्या आपल्या जागी जाऊन बसेल याचीही व्यवस्था केलेली असते. हे भिंग नैसर्गिक भिंगाच्या क्षमतेनेच काम करतं. त्यामुळे धूसर झालेली नजर परत साफ होऊन स्पष्ट आणि स्वच्छ प्रतिमा उमटते.

### पंचांग

**शनिवार, २३ मार्च २०२४**
शोभननाम संवत्सर, शके १९४५,
फाल्गुन शु. २, नक्षत्र : पूर्वा,
चंद्रराशी : सिंह, योग : शूल,
सूर्योदय : ०६.३९, सूर्यास्त : १८.५०

### फॉरवर्डस

**शारीरिक नव्हे तर भावनिक आणि बौद्धिक उंची महत्त्वाची...**

कद बढा नहीं करते
ऐडियाँ उठाने से
ऊंचाईयाँ तो मिलती हैं
सर झुकाने से

### टेक्नो टॉक

मोबाईल फोन चोरीला गेल्यानंतर चांगलीच पंचाईत होते. फोनमधला महत्त्वाचा डाटा, फोटो, व्हिडिओ लीक होण्याची भीती वाटत राहते. तुम्ही हा डाटा घरबसल्या डिलिट करू शकता. यासाठी माय डिव्हायसेस गूगल डॉट कॉमवर जा. स्मार्टफोनमध्ये सेव्ह केलेला जी मेल आयडी ओपन करा. इथे प्ले साउंड, सिक्योर डिव्हाइस आणि इरेझ डिव्हाईस असे पर्याय दिसतील. यापैकी इरेझ डिव्हाइसची निवड करा. यानंतर जीमेल आयडी आणि पासवर्डची नोंद करून पुढे जा. आता तुमच्या जुन्या फोनमधला डाटा डिलिट झाला असेल. अर्थात यासाठी जुन्या फोनचं इंटरनेट ऑन असायला हवं.

### फॅशन फॅशन — खरेदी पार्टीवेअर कपड्यांची

दोस्तांनो, लग्न, पार्टीचे कपडे महाग असतात, असा सर्वसाधारण समज. मात्र पार्टीवेअर कपड्यांसाठी प्रत्येक वेळी भरपूर पैसे खर्च करण्याची आवश्यकता नसते. कापडाचा योग्य प्रकार आणि चांगल्या ॲक्सेसरीजचा वापर करून साध्या कपड्यांनाही हटके लूक देता येईल. विशिष्ट प्रकारच्या कापडांचे स्वस्त कपडेही महाग वाटू शकतात. खिशाला फारसा ताण न देता कपड्यांची खरेदी करण्यासाठी कोणत्या कापडांची निवड करायला हवी याविषयी...

'स्युडे' हा लेदरचा एक प्रकार आहे. पादत्राणं आणि बॅग्ज तयार करण्यासाठी स्युडेचा वापर केला जातो. 'स्युडे' थोडं महाग असलं तरी बरंच टिकतं. हे कापड मऊ आणि उंची असलं तरी टिकाऊ असतं. तुम्ही 'स्युडे'पासून तयार केलेले बूट घेऊ शकता किंवा ट्रेंडी जॅकेटही खरेदी करू शकता. सिल्कची कशाशीही तुलना होऊ शकत नाही. सिल्कचा कुर्ता तसंच स्कार्फ खूप भारी दिसतात. सिल्कचे कपडे रिच लूक देतात. म्हणूनच सिल्कचे व्यक्तिमत्त्व खुलवण्यासाठी सिल्कच्या टायचा वापर करता येईल. 'ब्रोकेड' हा सुद्धा कापडाचा अजून एक उंची प्रकार. सण, समारंभासाठी ब्रोकेडच्या कपड्यांची निवड करता येईल. ब्रोकेड तुमचं स्टाईल स्टेटमेंट ठरू शकतं. कॉटनची गणना उंची कापडांमध्ये होत नसली तरी 'सुपिमा कॉटन' हा प्रकार अनोखा आहे. हे कापड नेहमीच्या कापडाच्या तुलनेत बरंच उंची आहे. त्यामुळे याचे कपडे शिवायला हरकत नाही.

### खेचाखेची — परवानगी

**प्रवासी :** साहेब, एक विचारू का? मी या ठिकाणी सिगारेट ओढू शकतो का?
**स्टेशन मास्तर :** नाही. या ठिकाणी सिगारेट ओढण्यास सक्त मनाई आहे.
.
**प्रवासी :** मग, या ठिकाणी इतके सारे सिगारेटचे तुकडे कसे काय?
.
**स्टेशन मास्तर :** इथं सिगारेट ओढू का, असं न विचारणाऱ्यांनी त तुकडे फेकले आहेत. कळलं?

### वेगळं काही — नवरी कुठे शोधायची?

अरबाब खिजर हयात नावाचा पाकिस्तानी मुलगा हल्क म्हणून ओळखला जातो. या अरबाबचं वजन ४४४ किलो आहे. याच कारणामुळे त्याला अजून नवरी मिळालेली नाही. अरबाब अजूनही वधू संशोधन करतो आहे. अरबाबला नाजूक नार नको आहे. अर्थात ४४४ किलो वजनाच्या अरबाबसोबत कोणतीही नाजूक मुलगी शोभून दिसणार नाही. त्यालाही एखादी बॉडीबिल्डरच हवी. नाही म्हणायला अरबाबला बरीच स्थळं आहे. पण त्याला एकही मुलगी पसंत पडली नाही. आपली पत्नी किमान १०० किलो वजनाची असावी असं त्याला वाटतं. एवढी उंच आणि धिप्पाड मुलगी शोधणं आव्हानात्मक आहे.

### हिरवी सोबत — बागकामाची आवड जोपासताना...

मैत्रिणींनो, कामाच्या धबडग्यात आपल्यातील अनेक क्षमता नजरेआड करतो. आपले अनेक छंद दुर्लक्षित राहतात. पण ते आवर्जून जपायला हवेत. आता हेच बघा... अनेकींना बागकामाची आवड असते मात्र, वेळेअभावी ती बाजूला सारावी लागते. तुम्हीही अशाच निसर्गप्रेमींपैकी एक असाल तर बागेचा जेरिस्केपिंग मार्ग अवलंबा. बागकामाचा हा अनोखा मार्ग अत्यंत कमी वेळेत आणि कमी खर्चात तुमच्या अंगणात, टेरेसमध्ये अथवा बाल्कनीत हिरवा शेजार फुलवू शकतो. गार्डनिंगच्या या पर्यायात मातीऐवजी भुसा, वाळलेलं गवत, भाज्यांचे देठ, फळांच्या साली आदींचा वापर केला जातो. हा पूर्णपणे नैसर्गिक रसायनांवर आधारित पर्याय असल्यामुळे कोणतंही रासायनिक खत घालावं लागत नाही. खत म्हणून सुकलेली पानं अथवा बारीक कापलेलं गवतही वापरता येतं. जेरिस्केपिंग गार्डनिंगद्वारे लावलेल्या रोपांना आलेली फुलं लवकर कोमेजत नाहीत. अशा प्रकारे लावलेल्या रोपांना वारंवार पाणी घालण्याचीही आवश्यकता नसते. अत्यंत कमी पाण्यात त्यांची चांगली वाढ होते, सहाजिकच निगराणीचा खर्च वाचतो.



दैनिक महाभूमि

# बुलढाणा भूमि

शनिवार, २३ मार्च २०२४

dainikmahabhoomi@gmail.com




धुलीवंदनाचा घ्या आनंद, पण रंगाचा होऊ देवू नका बेरंग...!

पान ८ वर...

**पवित्र रमजान**

इफ्तार : ६.४०
सहर : ५.१४

**हवामान अंदाज**

सूर्योदय : ६.२६ सकाळी
सूर्यास्त : ६.३७ सायं.
तापमान
कमाल : ३७°
किमान : २३°

**सोने-चांदी**

सोने (२२ कॅरेट प्रति तोळा)- ६५,४००
सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) - ६६,४००
चांदी (प्रति किलो) - ७४,०००

शक्तीप्रदर्शनाला चाप : तीन जीप गाड्यांची मर्यादा राहणार

# लोकसभा : अर्ज भरण्यासाठी केवळ पाच जणांना जाता येणार

बुलढाणा /प्रतिनिधी

लोकसभेसाठी अर्ज भरतेवेळी मोठे शक्तीप्रदर्शन केले जाते. पाठीमागे कार्यकर्त्याचा जत्था घेवून नेते जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल होतात यंदा मात्र आदर्श आचारसंहितेच्या तरतुदीनुसार याला निवडणूक आयोगाने चाप लावला आहे. अर्ज दाखल करण्यासाठी पाचच व्यक्तींना मुभा देण्यात आली असून कार्यकर्त्यासाठी तिन वाहनांची तरतुद आहे.

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी कार्यक्रम दि.१६ मार्च २०२४ रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्यापासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. बुलडाणा लोकसभा मतदारसंघासाठी दि. २८ मार्चपासून नामनिर्देशन दाखल करण्यात येणार आहे.



*"निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध घालण्यात आले आहे. सदर आदेश दि.१६ मार्च पासून ६ जून २०२४ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात अंमलात राहणार आहे.*

*- डॉ. किरण पाटील, जिल्हादंडाधिकारी*

नामनिर्देशनपत्र दाखल करताना उमेदवारांना तीन वाहने आणि पाच व्यक्तींना प्रवेश दिला जाणार आहे. उमेदवारांनी नामनिर्देशन दाखल करतेवेळी अवलंब करावयाची कार्यपद्धतीबाबत जिल्हाधिकारी यांनी आदेश दिले आहे. त्यानुसार जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय आणि न्यायपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी आदर्श आचारसंहितेच्या पालन करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या आहेत.

**..अन्यथा फौजदारी कारवाई**

*जिल्हाधिकारी यांनी जारी केलेल्या आदेशाचे उल्लघंन करणे उमेदवारांना महागात पडणार आहे. कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार आढळून आल्यास त्यावर फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) नुसार एकतर्फी आदेश काढून कारवाईचा बडगा उचलला जाणार आहे.*

**मालमत्ता विद्रुपीकरण केल्यास देखील कार्यवाही**

*लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायद्यांतर्गत कार्यवाही करण्यात येत आहे. निवडणुकीतील उमेदवार आणि त्यांच्या प्रतिनिधींनी परवानगी घेऊनच होर्डींग, बॅनर, पोस्टर्स लावावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. काही व्यक्ती, संस्था यांच्याकडून मोठ्याप्रमाणात अनाधिकृत होर्डीग, बॅनर्स, पोस्टर्स आणि भिंतीवर जाहिराती लावून शहराचे विद्रुपीकरण केले आहे. तसेच निवडणूक कालावधीत राजकीय पक्ष अथवा पक्षाशी संबंधित व्यक्ती, संस्था यांच्याकडून होर्डींग, बॅनर्स, पोस्टर आणि भिंतीवर जाहिराती लावून शहराचे विद्रुपीकरण करण्याची शक्यता आहे, असे आढळल्यास कारवाई केल्या जाणार आहे.*

## कॉँग्रेसलाच उमेदवारी द्या, निष्क्रिय उमेदवार नको..

### जिल्ह्यात कॉँग्रेस पदाधिकाऱ्यांचे सामूहिक राजीनामे

बुलढाणा / प्रतिनिधी



बुलढाणा लोकसभेसाठी राष्ट्रवादी कॉँग्रेस कडून तीन वेळा या मतदारसंघात लढत दिल्या गेली. इथे कॉँग्रेस प्रबळ असताना सुद्धा पराभव पत्करावा लागला आहे. त्यामुळे या वेळी निष्क्रिय उमेदवार न देता कॉँग्रेसचाच एखादा सक्षम उमेदवार द्यावा या मागणीसाठी कॉँग्रेसच्या तालुकाध्यक्षांनी राजीनामाअस्त्र वापरले आहे. यामुळे बुलढाण्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

महाविकास आघाडीमध्ये जागा निश्चितीबाबत अजूनही निर्णय झालेला नाही. कधी बुलडाणा लोकसभेची जागा शिवसेनेकडे तर कधी कॉँग्रेसने या जागेवर दावा केल्याने येथे संभ्रम वाढला आहे. त्यातच आता कॉँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी निष्क्रिय उमेदवाराचे काम न करण्याची भूमिका घेतल्याने राजकीय वातावरण उन्हाच्या कडाक्याबरोबर ४५ अंशावर तापले आहे.

बुलढाण्याची लोकसभेची जागा ही महाविकास आघाडी कडून उद्धव ठाकरे गटाला सोडण्यात आली आहे.

मात्र उद्धव ठाकरे गटाकडून नरेंद्र खेडेकर हे संभाव्य उमेदवार असल्याचे बोलले जाते.आम्हाला निष्क्रिय उमेदवार देऊ नये, आणि ही जागा महाविकास आघाडीकडून कॉँग्रेसला देण्यात यावी, या मागणीसाठी दबाव तंत्राचा वापर करत बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा, मोताळा, चिखली, जळगाव जामोद, शेगाव, संग्रामपूर, मलकापूर या ठिकाणच्या तालुकाप्रमुख, शहर प्रमुख आणि इतर पदाधिकाऱ्यांनी जिल्हाध्यक्ष राहुल बोंद्रे यांच्याकडे आपले राजीनामे सुपूर्द केले आहेत.

दत्ता काकस, कॉँग्रेस शहर अध्यक्ष बुलढाणा, रिजवान सौदागर, कॉँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष, गजानन मामलकर, कॉँग्रेस तालुकाध्यक्ष मोताळा आदींनी सह्याचे निवेदन जिल्हा अध्यक्षणा देऊन सक्षम उमेदवारांची मागणी केली आहे.

## थोडक्यात

### वृक्ष संगोपन व संवर्धन गरजेचे- तोंडिलायता

**बुलढाणा :** विद्यार्थ्यांना आपल आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी वनांमधील वृक्षाची संख्या वाढणे गरजेचे आहे. आज भारतात २६ टक्के वनसंपदा आहे. पण मनुष्य आपल्या स्वार्थासाठी ती नष्ट करीत आहे. त्यामुळे पर्यावरणाच ऱ्हास होत आहे. विद्यार्थ्यांनी स्वत: चे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी व पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी वृक्ष संगोपन व संवर्धन करणे अतिआवश्यक आहे, असे प्रतिपादन सामाजिक वनिकरण विभागचे वनपरिक्षेत्राधिकारी टी. आर.तोडिलायता यांनी केले आहे.

प्रबोधन विद्यालयात राष्ट्रीय हरित सेनेच्या वतीने २१ मार्च रोजी जागतिक वनदिन साजरा करण्यात आला. यावेळी मंचावर वनपरिक्षेत्राधिकारी टी. आर. तोडिलायता, वनपाल इंगळे, उपमुख्याध्यापक डॉ. गजानन चिम, राहसे शिक्षक रविंद्र गणेशे यांची उपस्थिती होती.

## पैगंबर सर्वासाठी अभियानातून सामाजिक चळवळ: मोहसीन शेख

**बुलढाणा :** रमजान हा समस्त मानव सेवेसाठी समर्पित समाज निर्माण करण्यासाठीचा प्रशिक्षणाचा महीना आहे. रोजा हा वाईट गोष्टीचा त्याग, सत्कर्म, परोपकार, नैतिकता, करुणा, दयाशीलता व गरजु शोषित अनाथ बालके व विधवांना मदत करण्याची प्रेरणा देतो. इस्लाम हा केवळ मुस्लिमांचा धर्म आहे हा गैरसमज असून इस्लाम ही मानव जातीची जीवन पद्धती आहे.असे प्रतिपादन मोहसीन शेख यांनी केले.पैगंम्बर सर्वांसाठी अभियान सध्या राबविले जात आहे.या निमित्त ठीकठिकाणी कार्यक्रम आयोजित आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी, बंजारा, दलित, आत्महत्याग्रस्त, शेतकऱ्यांच्या मुलांसोबत, अनाथ बालके व गरजु कुटुंबासमवेत तसेच बुलडाणा जिल्ह्यातील गरजु व आत्महत्याग्रस्त शेतकरी मुलांना कपडे व शिरखुरमा देऊन ईद साजरी केली जाणार आहे.

## मुख्याध्यापक चव्हाण यांच्या उपक्रमास राष्ट्रीय पुरस्कार

**मोताळा :** तालुक्यातील बोराखेडी येथील जि.प.शाळेचे मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांच्या नवोपक्रमास राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या मे महिन्यात सनदी अधिकारी व शिक्षण तज्ज्ञांच्या उपस्थितीत सदर पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे.

सर फाउंडेशनच्या वतीने नोव्हेंबर महिन्यात "राष्ट्रीयस्तर नवोपक्रम स्पर्धा २०२३" आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत हजारो शिक्षकांनी सहभाग नोंदवला. दरम्यान आदर्श जि. प. शाळा बोराखेडीचे मुख्याध्यापक अनिल चव्हाण यांनी या स्पर्धेत शालेय अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्र अध्ययन हे समग्र एकात्मिक आनंददायक आणि आकर्षक असावे, या विषयावर नाविन्यपूर्ण उपक्रम सादर केला होता. यात त्यांनी बोराखेडीच्या जि.प.शाळेत राबविलेल्या उपक्रमांची यशोगाथा मांडली होती. चव्हाण यांच्या या नवोपक्रमास "सर फाऊंडेशन एज्युकेशनल इनोव्हेशनल नॅशनल अवार्ड २०२३" हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

## निवडणूक कालावधीत ध्वनीक्षेपक वापरावर निर्बंध

बुलढाणा /प्रतिनिधी



लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये प्रचार मोहिमेच्या कालावधीत सर्व राजकीय पक्षाचे उमेदवार, तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार आणि त्यांचे कार्यकर्ते आणि हितचिंतक यांच्या ध्वनक्षेपक वापरावर निर्बंध घालण्यात आले आहे.

प्रचार वाहनावर ध्वनिक्षेपक बसवून मोठ्या आवाजात प्रचार केल्याने ध्वनी प्रदूषण होणे, सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनातील शांतता आणि स्वास्थास बाधा पोहोचण्याची आणि उशीरा रात्रीपर्यंत ध्वनीक्षेपण यंत्रणा चालू ठेवण्याची शक्यता असल्यामुळे ध्वनीक्षेपक वापरावर निर्बंध घालण्यात आले आहे.

जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (एन) मधील प्राप्त अधिकारानुसार निवडणुकीच्या प्रचारासाठी ध्वनीक्षेपकाचे वापरावर निर्बंध घालण्यात आले आहे. यात ध्वनीक्षेपकाचा वापर पोलिस अधिकारी यांच्या परवानगीशिवाय करता येणार नाही, सकाळी ६ वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजल्यानंतर कोणतेही फिरते वाहन आणि कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही, दिवसा प्रचाराकरीता फिरत्या वाहनांनी ध्वनीक्षेपकाचा वापर विशिष्ट ठिकाणी धांबूनच करावा,

ध्वनीक्षेपकाच्या आवाजासह फिरणाऱ्या वाहनांना प्रतिबंध आहे. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार आणि इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाचा वापरासंबंधी घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी संबंधित सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि संबंधीत यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहणार आहे.

सदरचे आदेश निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहणार आहे, असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले आहे.

### रहदारीस अडथळा टाळण्यासाठी निर्बंधाची अंमलबजावणी

**बुलढाणा :** लोकसभा निवडणुकीच्या कालावधीत रहदारीस अडथळा होऊ नये, यासाठी निर्बंध घालण्यात आले आहे. गैरसोयीसाठी नागरिकांनी नियमांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकांनी सार्वजनिक इमारतीचे ठिकाण, रस्त्यावर निवडणुकीसंबंधी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे त्यावर निर्बंध घालणे आवश्यक असल्याचे जिल्हादंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून सैलानी यात्रा परिसराची पाहणी

गणेश मोरे



**पिंपळगाव सराई:** बुलढाणा जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी शुक्रवार, २२ मार्च रोजी सैलानी यात्रा परिसराची सायंकाळी पाहणी केली.


यामध्ये आरोग्य रुग्ण सेवा कॅम्प तसेच परिसराचा आढावा घेण्यात आला. झिऱ्यांवर आंघोळ करणारे भाविक अंगातील कपडे झिरा परिसरामध्ये टाकतात. जुने कपडे भाविकांनी झिरा परिसरामध्ये टाकू नये, अशा सूचना दिल्या. तसेच यात्रेमध्ये ज्याठिकाणी होळी पेटवली जाते. त्या जागेची पाहणी करुन होळीमध्ये भाविकांनी अंगातील कपडे टाकू नये जेणेकरुन दुष्परिणाम होईल. तसेच सैलानी बसस्थानकावरुन सैलानी दर्गाकडे जाणारा रस्ता खराब झाला आहे. या रस्त्याचे मुजावर यांनी दानपत्र देऊन या रस्त्यासाठी त्वरित जिल्हा नियोजन मधून निधी उपलब्ध करुन देण्याचे जिल्हाधिकारी यांनी सांगितले. तसेच त्यांनी सैलानी येथे नवीन पोलीस चौकीची तसेच सीसीटीव्ही रुमची, ज्या रस्त्याने सैलानी बाबाचा संदल निघतो त्या रस्त्याची सुद्धा जिल्हाधिकारी यांनी पाहणी केली. यावेळी रायपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार दुर्गेश राजपूत, बुलढाणा पं.स.गटविकास अधिकारी सरिता पवार, महसूल विभाग, आरोग्य विभाग, पंचायत समितीचे कर्मचारी तसेच पिंपळगाव सराईचे सरपंच उपसरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते.






## ग्रंथालय संचालनालया तर्फे ग्रंथ खरेदीची यादी जाहीर

बुलढाणा /प्रतिनिधी



राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजनेंतर्गत ४८ व ४९ व्या ग्रंथ भेट योजनेंतर्गत ग्रंथांच्या खरेदीसाठी सन २०२१ व सन २०२२ मध्ये प्रकाशित व ग्रंथालय संचालनालयास प्राप्त ग्रंथांपैकी निवड केलेल्या मराठी ४८५, हिंदी २०४ व इंग्रजी २२१ अशा एकूण ९१० ग्रंथांची निवड करण्यात आली आहे.

या ग्रंथांची यादी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या htedu.maharashtra.gov.in/maim/ या संकेतस्थळावर १८ ते ३० मार्च २०२४ या कालावधीत अवलोकनार्थ खुली ठेवण्यात आली आहे.

या ग्रंथ यादीतील ग्रंथ किमान ३० टक्के सूट दराने वा त्यापेक्षा अधिक सूट दर देण्यास तयार असल्यास त्या सूट दराप्रमाणे ग्रंथांचा पुरवठा करणे आवश्यक राहील. याबाबत प्रकाशक, वितरकांनी देयकात स्पष्टपणे नमूद करावी लागेल.

या संदर्भात यादीतील कोणत्याही ग्रंथाबाबत सूचना, हरकती, आक्षेप असल्यास ३० मार्च २०२४ पर्यंत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगरभवन, मुंबई- ०१ यांच्याकडे लेखी स्वरूपात कार्यालयीन वेळेत हस्त बटवड्याने, टपालाने किंवा ई- मेलवर मुदतीत पाठवावेत. त्यानंतर आलेल्या सूचना, हरकती आणि आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

तसेच यादीत ग्रंथाचे नाव, लेखक, प्रकाशक, किमतीत काही बदल असल्यास निदर्शनास आणून द्यावे, असे अशोक मा. गाडेकर, प्र. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

# अस्वस्थ 'आप'...!

*देशातील लोकसभा निवडणुका सात टप्प्यांत होणार असून दिल्लीतील सर्व सात जागांवर सहाव्या टप्प्यात मतदान होणार आहे. ५४३ जागांसाठी लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या. दिल्लीत २५ मे रोजी मतदान होणार आहे. ४ जून रोजी निकाल जाहीर होणार आहेत. आम आदमी पार्टीची ताकत दिवसेंदिवस वाढतच आहे. २०१९ मध्ये भाजप, काँग्रेस आणि आपमध्ये तिरंगी लढत होती, मात्र यावेळी चित्र वेगळे राहणार आहे. आप चार जागांवर लढणार असल्याचे दिसून येते. त्यामध्ये आप नवी दिल्ली, दक्षिण दिल्ली, पश्चिम दिल्ली आणि पूर्व दिल्ली या चार जागा लढवणार आहे. दिल्लीतील निवडणुकांना अद्याप दोन महिन्यांहून अधिक कालावधी शिल्लक आहे. परंतू निवडणुकांपूर्वीच आम आदमी पार्टीवर मोठं संकट आलं आहे. एकीकडे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत भाजप आणि काँग्रेसच्या गोटात बैठकांचं सत्र सुरु आहे. दुसरीकडे दिल्ली सरकारमध्ये मोठा भूकंप आल्याचे चित्र आहे. कारण ईडीने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करणे म्हणजे निवडणुकीत आपला धक्काच बसणे आहे. याशिवाय ईडीकडून गेल्या १५ दिवसांत दुसऱ्यांदा मुख्यमंत्र्यांना अटक करण्यात येत आहे. याआधी झारखंडमध्ये हेमंत सोरेन यांना अटक करण्यात आली होती. पण हेमंत सोरेन यांनी अटकेआधी राजीनामा दिला होता. अरविंद केजरीवाल यांनी राजीनामा दिलेला नाही. त्यामुळे त्यांना कथिक दारुविक्री घोटाळा प्रकरणावरुन अटक करण्यात आली आहे. अरविंद केजरीवाल यांना अटक केल्यानंतर दारुविक्री घोटाळा नेमका काय आहे? असा प्रश्न अनेकांच्या मनात येणारच. दिल्ली सरकारने २०२१-२२ साली दारुविक्रीबाबत एक नवीन धोरण बनवले होते. सरकारी महामंडळांऐवजी दारु विक्रीचे अधिकार खासगी वितरकांना देण्यात आले होते. दिल्लीतल्या एकूण १६ विक्रेत्यांना दारु वितरणाची जबाबदारी दिली. केजरीवाल सरकारने म्हटले की, नव्या धोरणाने दारुचा काळाबाजार थांबला. नव्या धोरणामुळे दिल्ली सरकारच्या महसुलात मोठी वाढही झाली. मात्र यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप विरोधकांचा आहे. याच प्रकरणी दिल्लीचे तत्कालीन उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना अटक झाली होती. ते अजूनही जेलमध्येच आहेत. याशिवाय अनेक मोठ्या नेत्यांना या प्रकरणात याआधीही अटक करण्यात आली आहे. परंतू आता ऐन निवडणुकीच्या धामधुमीत केजरीवाल यांना अटक झाल्याने दिल्लीत आप कमकुवत होऊ शकते आणि निवडणूक लढवण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. मोफत वीज, पाणी, आरोग्य आणि शिक्षण या योजनांमुळे केजरीवाल चांगलेच चर्चेत होते. मोदी सरकारच्या चांगल्या कामांशी एकप्रकारे दिल्लीतील कामांची स्पर्धाच सुरू होती असे म्हणणे याठिकाणी चुकीचे ठरणार नाही. भाजपसाठी केजरीवाल धोका असल्याचे भाजपा नेत्यांचे मत आहे. गेल्या काही वर्षांपूर्वी पक्षातून काढून टाकण्यात आलेले 'आप'चे माजी नेते आनंद कुमार यांनीही यावर भाष्य केले. केजरीवाल सरकारने राबवलेल्या चांगल्या योजना त्यांना गतवैभव प्राप्त करून देऊ शकतात. महाराष्ट्रातही दिल्लीच्या योजनांची एक चांगली चर्चा होती. इंडिया आघाडीला एकत्र आणण्यात केजरीवालांनी बजावलेल्या भूमिकेमुळेच कदाचित असे झाले असावे, असाही अंदाज काहींनी लावला आहे. निवडणूका लागलेल्या असताना आता अरविंद केजरीवाल यांना अटक झाल्याने त्यांना अनेक कायदेशीर टप्प्यांतून जावे लागणार आहे. त्यामुळे अरविंद केजरीवाल यांच्या अटकेचा फायदा कोणाला होणार आहे? असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे. केवळ दिल्ली आणि पंजाबमध्ये 'आप'ला मोठा धक्का बसलेला नव्हे, तर इतर ठिकाणीही आता आप नेतृत्वाअभावी अस्वस्थ होऊ शकते. आपची ही अस्वस्थता लोकसभा निवडणुकीमध्ये काहीना काही परिणामकारक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.*

# आता तिसरी मुंबई !


## खास बात

● अजय तिवारी

मुंबईवरचा ताण कमी करण्यासाठी नवी मुंबईची रचना करण्यात आली. मात्र गेल्या दोन दशकांमध्ये नव्या मुंबईचीही जुनी मुंबई झाली. त्यानंतर आता तिसरी मुंबई विकसित करण्याची जबाबदारी मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाकडे सोपवण्यात आली आहे. कशी असेल ही तिसरी मुंबई आणि ती उभी राहिल्यानंतर तरी मुंबईकरांना मोकळा श्वास घेता येणार आहे का?

नवी मुंबईजवळ तिसरी मुंबई होणार, ही चर्चा दोन दशकांपासून सुरू आहे. यासाठी 'सिडको'ने खोपटा नवनगर प्रकल्प प्रस्तावित केला होता; पण तिसरी मुंबई विकसित करण्यासाठी राज्य सरकारने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणला विशेष अधिकार दिले आहेत. हा 'सिडको'साठी मोठा धक्का मानला जात आहे. 'सिडको'कडे नवी शहरे वसवण्याचा दीर्घ अनुभव आहे. ३४४ चौरस किलोमीटरवर करण्यात आलेली नवी मुंबईची निर्मिती हे याचे उत्तम उदाहरण; तरीही तिसर्या मुंबईसाठी 'एमएमआरडीए'चा विचार झाला. आता 'एमएमआरडीए' पनवेल, उरण, पेण तसेच कर्जत तालुक्यांमधील २०० गावांमधील ३२३ चौरस किलोमीटर क्षेत्रात तिसरी मुंबई उभारणार असून त्याचा विकास आराखडा लवकरच सरकारकडे पाठवण्यात येणार आहे. नवी मुंबईच्या खारघरमध्ये म्हणजे विमानतळाच्या परिसरात आता मेट्रो धावू लागली आहे. पनवेल-खारघर-बेलापूर-उलवे-उरण या खाडीपट्ट्यातील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय ग्रीनफिल्ड विमानतळाचे काम वेगाने सुरू आहे. अटल सेतू सुरू झाला आहे. तिसरी मुंबई विकसित झाल्यास मुंबई, नवी मुंबईवरील लोकसंख्या आणि कार्यालयांचा भार हलका होईल, असा सरकारचा कयास आहे. यापूर्वी नवी मुंबई विकसित झाल्यानंतर मुंबईचा भार हलका होईल, असे सांगण्यात आले होते; परंतु प्रत्यक्षात शासकीय तसेच खासगी कार्यालयांचे किती विकेंद्रीकरण झाले, हा संशोधनाचा मुद्दा आहे.

आजघडीला शिवडी-उरण सागरी पुलामुळे मुंबई थेट जोडली जात असल्याने तिसरी मुंबई म्हणून उरण-पनवेल तालुक्यांचा विचार पूर्वीपासून केला जात होता. मुंबईची लोकसंख्या प्रचंड वाढल्याने साठच्या दशकात नवी मुंबईच्या निर्मितीचा विचार होऊ लागला होता. पुढे काही वर्षांनी महाराष्ट्र सरकारने 'सिडको' महामंडळाची स्थापना करून त्यांच्याकडे ही जबाबदारी सोपवण्यात आली होती. 'सिडको'ने ही जबाबदारी पूर्ण केली. त्यामुळे तिसर्या मुंबईची चर्चा सुरू झाली तेव्हा 'सिडको'ने तिसरी मुंबई वसवण्याच्या दृष्टीने पनवेल आणि उरण तालुक्यांमधील ३२ गावांचा समावेश करून खोपटा नवनगर प्रकल्पाचा प्रस्ताव आणि विकास आराखडा सरकारकडे काही वर्षांपूर्वी पाठवला होता; परंतु ही जबाबदारी आता 'एमएमआरडीए'कडे आली आहे. 'एमएमआरडीए'ला 'न्यू टाऊन डेव्हलमेंट ऑथोरिटी' म्हणून विशेष अधिकार दिले गेले आहेत. विशेष म्हणजे नवी मुंबई एअरपोर्ट इन्फ्लुएन्स नोटिफाईड एरिया अर्थात 'नैना' क्षेत्रातील ८० गावांचाही यात समावेश आहे. विमानतळ, वाहतुकीसाठी उरण-न्हावा समुद्रपूल, शिवाय प्रशस्त पनवेल-उरण सीमेंट काँक्रिटचा रस्ता यामुळे या भागातील दळणवळणाचा प्रश्न मार्गी लागला आहे. आता प्रश्न आहे भूसंपादन करून शहराची नियोजनबद्ध निर्मिती करण्याचा. यात बहुराष्ट्रीय कंपन्या, मॉल, व्यापारी संकुले, बँकांचे जाळे, हॉटेल आदींसाठी सुविधा निर्माण करण्यात येतील. त्यामुळे नोकर्यांची ठिकाणे, व्यवसाय मुंबईतून 'तिसरी मुंबई'त स्थलांतरित होतील आणि मुंबईवरील ताण कमी होईल, अशी अपेक्षा आहे. मुंबईच्या पायाभूत सुविधांवरील मर्यादा, भविष्यातील सांडपाण्याची समस्या, पाण्याची समस्या, लोकलवरील वाढता ताण, वाहतूक कोंडीची कायमची समस्या लक्षात घेऊन तिसरी मुंबई विकसित करण्यावर सरकारचा भर आहे. मुंबईत जशी बीकेसी आहे, तसे भव्य-दिव्य संकुल खारघरमध्ये निर्माण करण्याचा प्रस्ताव आहे. तिसर्या मुंबईचे अधिकार 'सिडको'ऐवजी 'एमएमआरडीए'कडे दिल्यामुळे भूसंपादनाचे मोठे आव्हान असणार आहे. 'सिडको'ला नवी मुंबईची नस माहीत असल्याने भूसंपादन, त्याचा मोबदला, प्रकल्पग्रस्तांशी व्यवहार करण्याचा दीर्घ अनुभव आहे. आता हे सर्व करण्याचे मोठे आव्हान 'एमएमआरडीए'ला पेलावे लागणार आहे. हे शहर मुंबई ट्रान्स हार्बर लिंकद्वारे मुंबईशी जोडले जाईल.




उदयास येत असलेल्या या परिसरात पनवेल, उरण तालुक्यातील २३ गावांमध्ये रस्ते बांधण्यासाठी सिडको बारा हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. नैना परिसरात नगररचना योजना १ ते १२ अंतर्गत रस्त्यांचे जाळे उभारण्यासाठी रस्त्यावरील सर्व अतिक्रमणे हटवली जातील. रस्ता तयार करताना सिग्नल यंत्रणा किंवा दुभाजक नसावेत याची काळजी घेतली जाईल. त्यामुळे रस्ते सरळ रेषेत असतील आणि गरज असेल तिथे उड्डाणपूल किंवा अंडरपास बांधले जातील. यामुळे चौक आणि सिग्नलशिवाय आधुनिक डिझाइन केलेले रस्ते तयार करणार आहे.

नैना परिसरात विकासकामे जलद गतीने होत नसल्याचे दिसून आले आहे. स्थानिक ग्रामस्थही नैना प्रकल्पाला विरोध करत आहेत. 'सिडको'ने नवीन क्षेत्रांचा विकास एकात्मिक पद्धतीने न करता तुकड्यांमध्ये केला आहे. त्यामुळे स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकर्यांना आपल्या भूखंडाची रास्त किंमत मिळत नाही. त्यामुळे आता परिसरातील १२ नोड नैना टप्प्याटप्प्याने नव्हे, तर एकाच टप्प्यात विकसित करणार आहे. आर्थिक क्रियाकलापांना आणि देशाच्या जीडीपीला चालना देण्यासाठी नवीन शहराचे नियोजन करण्यात आले आहे. मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येसाठी उत्तम घरे, वाहतूक सुविधा आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. 'तिसर्या मुंबई'साठी नवीन शहर विकास प्राधिकरण (एनटीडीए) स्थापन करण्यात येणार आहे. ३२३ चौरस किलोमीटरमध्ये पसरलेल्या या शहरामध्ये उळवे, पेण, पनवेल, उरण, कर्जत आणि इतर काही परिसराचा समावेश असेल. नवी मुंबई विमानतळाजवळील ८०-९० गावांसह सुमारे २०० गावेही 'तिसर्या मुंबई'चा भाग होण्याची अपेक्षा आहे. 'तिसर्या मुंबई'मध्ये सर्व आवश्यक पायाभूत सुविधा चांगल्या विकसित शहरासारख्या असतील. त्यात लक्झरी आणि परवडणारी निवासी क्षेत्रे, व्यापारी संकुले, डेटा सेंटर ते मोठे ज्ञान पार्क आणि वित्तीय कंपन्या या दोन्हींचा समावेश असेल. मुंबईतील लोकल यंत्रणेप्रमाणे त्यातही सार्वजनिक वाहतुकीची चांगली व्यवस्था करण्यात येणार आहे. खारघर परिसरामध्ये साधारणपणे १५० हेक्टर क्षेत्रावर पसरलेले हे क्षेत्र पूर्णपणे व्यावसायिक क्षेत्र म्हणून विकसित करण्याची योजना आहे. तिथे भारतीय कंपन्या तसेच बहुराष्ट्रीय कंपन्यांची कार्यालये असू शकतात. गेल्या महिन्यात 'एमएमआरडीए'ने मुंबईच्या आसपास आर्थिक आणि व्यावसायिक उपक्रमांसाठी नवीन झोन स्थापन करण्याच्या आवश्यकतेवर चर्चा केली होती. बाहेरील भागात सार्वजनिक वाहतूक बळकट करण्यासाठी 'मुंबई रेल विकास कॉर्पोरेशन'ने ८१२ कोटी रुपये खर्चून 'नवीन पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे कॉरिडॉर'ची योजना आखली आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. २०३० पर्यंत मुंबईचा जीडीपी सध्याच्या १४० अब्ज डॉलरवरून तीनशे अब्ज डॉलरपर्यंत वाढेल, असा नीती आयोगाचा अंदाज आहे.

सागरी सेतू झाल्याने मुंबई आणि नवी मुंबई शहरातील अंतर कमी होणार असल्याने नवी मुंबईत कामासाठी वा वास्तव्यासाठी येणार्यांची संख्या वाढणार असल्याचे म्हटले जात आहे. त्याच वेळी सागरी सेतूच्या आसपासच्या परिसरात औद्योगिक विकासाच्याही संधी निर्माण होतील, असे 'एमएमआरडीए'चे म्हणणे आहे.


त्यामुळेच 'एमएमआरडीए'ने आपल्या विकास केंद्राच्या प्रकल्पात मुंबई पारबंदर प्रकल्प प्रभावित क्षेत्रात एक विकास केंद्र प्रस्तावित केले आहे. आर्थिक, औद्योगिक विकासाच्या अनुषंगाने येथे आवश्यक तो विकासही करण्यात येणार आहे. नवी मुंबईप्रमाणे हे नवनगर विकसित होणार आहे. ही तिसरी मुंबई अतिशय 'हायटेक' असणार आहे. पुरेपूर विकास आणि नवीन गोष्टींचा समावेश यात असेल. तिसर्या मुंबईमध्ये नागरिकांसाठी उत्तम पायाभूत सुविधांसह रोजगारांच्याही संधी उपलब्ध केल्या जाणार आहेत. त्यामुळे रोजगाराच्या शोधत असलेल्या तरुण, तरुणी आणि बेरोजगारांसाठी ही चांगली संध ी असेल. तिसर्या मुंबईचा विकास करताना अडचणी येऊ नयेत, यासाठी भूमी अधिग्रहण कायद्यातही सुधारणा केली जाणार आहे. स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकर्यांना भूखंडांचा योग्य मोबदला देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. मुंबईत रोज हजारोंच्या संख्येने लोंढा येतच असतो. तिसर्या मुंबईमुळे मुंबईवरचा ताण कमी होईल अशी अपेक्षा सर्वांनाच आहे. मुंबईमध्ये प्रदूषण प्रचंड वाढले आहे, तसेच नवी मुंबईतही आता गर्दी होऊ लागली आहे. हीच बाब लक्षात घेऊन ही तिसरी मुंबई सर्वांसाठी चांगली ठरावी, अशी अपेक्षा आहे.

# क्रांतिची प्रेरणा :शहीद भगतसिंह

## प्रासंगिक

● संजय खांडवे
मो.नं. ९०११९७११२२

आजचा पाकिस्तानचा भाग असलेला ल्यालपूर बंगा येथे २८ सप्टेंबर १९०७ रोजी भगतसिंहाचा जन्म झाला. आई विद्यावती कौर आणि वडील किशनसिंह यांच्या संस्कारातून भगत सिंहासारख्या महापुरुषाची जडणघडण झाली. देशभक्तीचे वातावरण त्यांच्या घरातच होते त्यांच्या आजोबापासून प्रत्येक जन क्रांतिकारी चळवळीशी जुळलेले होते. यावरुन लक्षात येते की भगतसिंह ज्या गोतावळ्यात वाढले त्यात क्रांती केवळ बोलण्याचा विषय नसून तर प्रत्यक्ष कृतीचा विषय येतो. संघर्ष, त्याग, बलिदान या गोष्टी तर त्यांच्या कुटुंबीयांसाठी जगण्याची प्रेरणाच होती. त्यांचे काका स्वर्णसिंह आणि अजितसिंह यांच्या देशभक्तीच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. आजही भगतसिंहाचे नाव जरी उच्चारले तरी मानवतेशी जुळलेल्या चेतना ज्यांच्या हयदयात आहे त्यांची देशभक्ती आपसूकपणे जागृत होते. देशासाठी अन मानवतेसाठी काहीतरी करावं ही भावना मनात तयार होते. भगतसिंहाचे चरित्र तरुणांसाठी एक आदर्श आहे स्वातंत्र्यासाठी आणि मानवाच्या कल्याणार्थ स्वाभिमान कसा जागृत ठेवावा आणि त्यासाठी संघर्ष कसा करावा, याचबरोबर त्यागाचे ही सर्वोच्च प्रेरणास्थान भगतसिंह ठरतात. अगदी बालपणापासून त्यांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबात देशभक्ती किती ओत प्रत भरलेली आहे. हे त्यांच्या एका प्रसंगावरून दिसून येते. एकदा मेहता आनंद किशोर हे क्रांतिकारक भगतसिंहाच्या घरी आले होते. तेव्हा चार वर्षाचा भगत लाकडी बंदुका शेतात चिखलात फिरत होता. मेहतांनी विचारले, ''काय करतोस ? ''तेव्हा भगतने उत्तर दिले कि, ''मी



बंदुका पेरतो आहे, उद्या या झाडांना बंदुका लागतील आणि त्या घेऊन मी ब्रिटिशांना या देशातून हाकलून लावेल. ''चार वर्षाच्या भगतसिंहामध्ये हा अलौकिक आत्मविश्वास कोठून निर्माण झाला? असा प्रश्न जेव्हा पडतो तेव्हा त्यांच्या कुटुंबीयापुढे आणि त्यांनी केलेल्या संस्कारापुढे आपसूकपणे आपण नतमस्तक होतो. ही त्याग अन देशाप्रती समर्पित होण्याची भावना त्या बालकाच्या मनात निर्माण होणे ही त्यांच्या आई-वडिलांच्या आणि कुटुंबीयांच्या मातृभूमी प्रति असलेल्या उच्च कोटीच्या असामान्य देशभक्तीचीच प्रचीती आहे.

देशाला इंग्रजांच्या गुलामगिरीतून बाहेर काढून स्वतंत्र करणे हा त्यांच्या जीवनाचा मुख्य उद्देश होता. गुलामगिरीत खितपत पडणे त्यांना कदापिही मान्य नव्हते. स्वातंत्र्यासाठी ते आयुष्यात कोणतीही किंमत मोजण्यास तयार होते. आपला देश गुलामगिरीत आहे आणि आपण स्वस्थ बसायचं हे त्यांना अजिबात मान्य नव्हते. भगतसिंह जेलमध्ये असताना देखील ते कधीच थांबले नाही त्या ठिकाणी सुद्धा वाचन, चिंतन आणि लेखनाचा विडा त्यांनी उचलला होता. १९२९ मध्ये भगतसिंहांना अटक झाल्यावर ते जवळपास अडीच वर्ष तुरुंगात होते. त्यांना फाशीची शिक्षा झालेली असून सुद्धा ते किंचितही विचलित झाले नव्हते. कोणत्याही प्रकारचे दुःख त्यांना जाणवत नव्हते. अलौकिक आत्मविश्वासासह अगदी निर्भीडपणे शिस्तबध्द तेने त्यांनी आपला वेळ तुरुंगात असताना अभ्यासात, वाचनात अन लेखणात घालविला. ७१३ दिवसाच्या तुरुंगवासात इंग्रजी, हिंदी, बंगाली, उर्दू भाषेतील ३०२ ग्रंथ वाचून काढले. या वाचनातून आपले क्रांतिकारी विचार त्यांनी पुढे लेखनबद्ध केले. तत्कालीन परिस्थितीचा विचार करत देशाच्या च नव्हे तर जगाच्या सुद्धा सामाजिक, राजकीय, धार्मिक, आर्थिक' सांस्कृतिक विषयांची तर्कसंगत पद्धतीने विचार करून त्याची मांडणी केली. साम्राज्यवाद, सामंत शाही, लोकशाही, भांडवलशाही या विषयावरही भाष्य केले. जगातील सर्वच महत्वाच्या राजकीय क्रांतीचा अभ्यास केला. स्वातंत्र्याच्या महानकार्यासाठी, मातृभूमीच्या रक्षणासाठी बलिदानाचे महत्त्वही त्यांनी आपल्या लिखाणातून विषद करत धर्माचा ही तुलनात्मक अभ्यास करून नास्तिकतेची परिभाषा त्यांनी या बंदीवासात असताना केली आहे. या काळात त्यांनी चार ग्रंथ लिहून काढले. यामधील ''Why I am an Atheist'' हा लेख प्रत्येक भारतीय तरुणांनी वाचलाच पाहिजे असा आहे. भारतीय तरुणांपुढे भगतसिंहांचा आदर्श आहेच, पण फोटो पाहून आजच्या सोशल मीडियाच्या युगात स्टेटस ठेवण्यापुरता किंवा ''इन्कलाब जिंदाबाद ! ''एवढंच म्हणण्यापुरता नसावा. तर भगतसिंहांनी लिहिलेले तुम्हा आम्हा सारख्या तरुणांना प्रेरणादायी ठरणारे भगतसिंहाचे साहित्य प्रत्येकाने वाचलेच पाहिजे.

त्यांच्या जेल डायरीमधील पान १९ वरील जेम्स रसेल लॉवेल या अमेरिकन तत्त्ववेत्याने ''स्वातंत्र्य'' या विषयावर लिहिलेली कविता या ठिकाणी नमूद करावीशी वाटते.

मर्दानो, फुशारक्या मारता तुम्ही,
मर्दुमकी आणि स्वातंत्र्याच्या,
परंतु , खरंच आहे का,
तुमच्यात धमक आणि तुम्हाला स्वातंत्र्य ?
साखळदंडात कुजणाऱ्या बांधवांच्या वेदना जाणवत,
तुम्ही मुक्त असताना कोणी गुलामीत मरत असेल,
तर तुम्ही सुद्धा षंढपणा पांघरलेले गुलामच नाही का ?
मुक्त वावरण्याच्यातुम्हाला हक्क तरी काय ?
फक्त स्वतःला मुक्त कर विणे,
यालाच का खरे स्वातंत्र्य म्हणतात ?
मानवजातीप्रती जबाबदारी विसरणे,
यालाच का खरे स्वातंत्र्य म्हणतात ?
खरे स्वातंत्र्य तर त्याला म्हणावे,
जिथे प्रत्येकाने दुसऱ्याच्या गुलामीचा भार,
अखंड मानवजात मुक्त करण्याचा ध्यास घ्यावा
जे गुलामगिरीच्या विरोधात उभे राहू शकत नाही,
त्यांना खरे गुलाम म्हणावे,
उपहास आणि तिरस्काराच्या भीतीने जे शांत बसतात,
त्या गुन्हेगारांना गुलाम म्हणावे,
केवळ संख्या कमी आहे म्हणून सत्याच्या बाजूने उभे राहायला जे घाबरतात,
त्या नामर्दांना गुलाम म्हणावे.

यावरून लक्षात येते की शहीद भगतसिंह हे स्वातंत्र्य आणि गुलामगिरी याबद्दल काय म्हणत होते. सत्याच्या बाजूने उभे राहणे हे १७ व्या शतकातील महाराष्ट्रातील पहिले मराठी लोककवी जगद्गुरु तुकाराम महाराज यांनी आपल्या काव्यातून सांगितले होते ''सत्य असत्याशी मन केले ग्वाही । मानिअले नाही बहुमता ।। ''तेच पुढे १९ व्या शतकात जेम्स रसेल आपल्या काव्यातून मांडतात व पुढे सत्याची अन सत्यासाठीची त्याग अन समर्पनाची क्रांतिकारी धार भगतसिंह आपल्या क्रांतीतून दाखवून देतात. ते म्हणत मानवतेला प्रभावित करणाऱ्या सर्वच गोष्टीशी माझा संबंध आहे. त्यांना लाभलेल्या अत्यल्प आयुष्यातही प्रतिकूल परिस्थितीत सखोल वैचारिक चिंतन घडवून एक आदर्श नव तरुणांपुढे उभा केला. आपल्या देशाचे उज्वल भविष्य कोठे आहे हे त्यांनी जाणले होते म्हणून त्यांचे विचार हे मानवतेच्या कल्याणार्थ आजही लागू पडतात.

# 'आयएसबी'च्या सायबर सुरक्षेबाबत अहवालाचे प्रकाशन

पायरसी वेबसाइट्स मालवेअरचा प्रसार करण्यासाठी मोठे मध्यम बनले आहेत. ग्राहक केवळ पायरेटेड मुव्ही किंवा टीव्ही शो पाहत नसून ते त्यांच्या 'डिव्हाइस'शी तडजोड करत आहेत आणि तुमचे ' डिव्हाईस' 'दुसरे तुम्हीच' आहात. त्यात तुमची ओळख, तुमचे बँकिंग तपशील, तुमचे मित्र आणि कुटुंबीयांचे तपशील असतो. अनेक वर्षांपासून ज्या गोष्टी संदिग्ध होत्या, त्यांचा आता या अहवालात खुलासा करण्यात आला आहे. आयएसबी (इंडियन स्कूल ऑफ बिझिनेस) चा अहवाल या बदलाची सुरुवात आहे, असे मत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक तथा मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केले.

आयएसबी (इंडियन स्कूल ऑफ बिझनेस) द्वारे सायबर सुरक्षेबाबत सर्वंकष अभ्यास करण्यात आला. या अभ्यासावरील अहवालाचे प्रकाशन मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, दक्षिण आशियाचे अमेरिकी बौद्धिक संपदा सल्लागार जॉन कॅबेका, प्रादेशिक संचालन प्रमुख नील गणे आणि आयएसबी ' 'इन्स्टिट्यूट ऑफ डेटा सायन्स'चे प्रा. मनीष गंगवार आदी मान्यवरांच्या हस्ते वाणिज्य दूतावास, मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. यावेळी कार्यकारी संचालक मनीष गंगवार, ला ट्रोब युनिव्हर्सिटी (मेलबर्न) येथील सायबर सुरक्षा विभागाचे सहायक प्रा. डॉ. पॉल वॉटर्स, कॅरिन टेंपल यांनीही आपली मते मांडली.

'आयएसबी इन्स्टिट्यूट ऑफ डेटा सायन्स' चे प्रा. गंगवार आणि डॉ. श्रुती मंत्री, मेलबोर्नच्या 'ला ट्रोब युनिव्हर्सिटी' येथील सायबर सिक्युरिटीचे सहायक प्राध्यापक डॉ. पॉल वॉटर्स यांनी 'दि पायरसी- मालवेअर नेक्सस इन इंडिया : अ परसेप्शन आणि अनुभव आणि अनुभवजन्य विश्लेषण' या कार्यक्रमाचे आयोजन वाणिज्य दूतावास, मुंबई येथे अलायन्स फॉर क्रिएटिव्हिटी अँण्ड एन्टरटेन्मेट (एसीई), आयएसबी इन्स्टिट्यूट ऑफ डेटा सायन्स (आयआयडीएस ) आणि एसीई यांनी युनायटेड स्टेट्स पेटंट अँण्ड ट्रेडमार्क ऑफिस (यूएसपीटीओ) च्या सहकार्याने आयोजित करण्यात आला.

**अहवालातील निष्कर्ष**

अहवालात प्रौढ उद्योग ५७ टक्के आणि जुगाराशी संबंधित जाहिरातीच्या ५३ टक्के तुलनेत पायरसी साइट्समध्ये प्रवेश केल्याने मालवेअर संसर्गाचा ५९ टक्के जास्त धोका उद्भवतो. 'वायरस टोटल' चा उपयोग करून १५० वेबसाइट्सच्या विश्लेषणात मालवेअर, संशयास्पद क्रियाकलाप, फिशिंगचे प्रयत्न आणि स्पॅम यासारख्या सायबर जोखीम असल्याचे समोर आले. मानक पायरसी संकेतस्थळांच्या तुलनेत ''स्कॅम पायरसी संकेतस्थळ'' उपयोग कर्त्यांना सायबर धोक्यांना समोर आणण्याचा धोका जास्त असतो.

मालवेअर वितरण पायरसी साइट संचालकांसाठी अतिरिक्त महसूल उत्पन्न करण्यासाठी भारतात ऑनलाइन पायरसी फायदेशीर राहिली आहे. भारतीय ग्राहक पायरसी साइट्सचा उपयोग करतांना त्यांच्या खऱ्या सायबर जोखमीला कमी लेखतात, पायरसी संकेतस्थळाशी संबंधित सायबर सुरक्षा धोक्यांकडे लक्ष देण्याची तातडीची गरज आहे यावर भर देतात. इंडियन स्कूल ऑफ बिझनेसच्या (आयएसबी ) सायबर सुरक्षा तज्ञांनी केलेल्या तळागाळातील धारणा आणि अनुभव अध्ययनात (ग्राऊंड पर्सेप्शन अँण्ड एक्सपिरिअन्स स्टडी) मालवेअर संसर्गाचा भारतीय ग्राहकांसाठी ५९ टक्के जोखीम असलेल्या पायरसी वेबसाइट्स एक प्रमुख धोका असल्याचे समोर आले आहे. विशेष चिंतेची बाब म्हणजे १८-२४ वर्षे वयोगटातील उपयोगकर्ते जे या प्लॅटफॉर्मवर जास्त व्यस्त असतात त्यांच्यात सायबर धोक्यांबाबत कमी जागरूकता असल्याचे दिसून आले.

हे सर्वेक्षण हे २३ ते २९ मे २०२३ या कालावधीत करण्यात आले. '' नॅशनल ऑम्निबसचा भाग म्हणून भारतातील १०३७ उत्तरदात्यांचा यात समावेश आहे. भारतातील प्रौढ नागरिकांच्या वारंवारतेच्या प्रमाणात लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांवर आधारित १८ वर्षांपेक्षा जास्त वयोगटातील ऑनलाइन लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करण्यासाठी डेटाचे संतुलन करण्यात आले.

-नीलेश तायडे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** (अदिती एन्टरप्रायजेस बुलढाणा) यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक-**सुरेश बाबुराव देवकर**, *कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची)
दैनिक महाभूमि
**RNI Tital Code No.MAHMAR 52575** ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)
This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** (Aditi Enterprises Buldhana) Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao**

## दोन एकर शेतीतून घेतले १० लाखांचे उत्पन्न..

# द्राक्ष बागेतून ‘शेळकेंच्या’ आयुष्यात आला गोडवा

राम हिंगे

**बुलढाणा :** पीक पद्धतीत बदल करत , आधुनिकेतेची कास धरुन शेतकरी फळबागांकडे वळत असल्याचे आश्वसक चित्र जिल्ह्यात पाहावयास मिळत आहे. प्रामुख्याने नाशिक सांगली, पुणे, सोलापूर भागात घेतले जाणारे द्राक्ष पीक चिखली तालुक्यातील मलगी येथील अंबादास नंदकिशोर शेळके यांनी घेवून द्राक्ष बागेतून आपल्या आयुष्यात गोडवा आणला आहे.



अंबादास शेळके यांच्याकडे १२ एकर शेती असून ते पारंपारिक पद्धतीने सोयाबीन, तूर गहू, हरभरा या पीकांचा पेरा करत होते. यातून अपेक्षित तसे उत्पन्न मिळत नसल्याने त्यांनी फेब्रुवारी २०२० मध्ये दोन एकरात द्राक्ष बाग करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ९ x ५ वर २ हजार रोपांची लागवड केली. सुरवातीच्या दोन वर्षात बागेचे व्यवस्थापन करतांना आलेल्या अडचणींमुळे तोटा सहन करावा लागला. मात्र २०२३-२४ या वर्षी ३०० क्विंटल द्राक्ष विक्रीतून १० लाखांचे उत्पन्न झाल्याने त्यांच्या जीवनात आर्थिक सुबकत्ता आली आहे.

शेळके यांनी सिंचनासाठी एका एकरामध्ये ३४ x ३४ चे शेततळे तयार केले असून ठिंबकद्वारे बागेला पाणी दिल्या जाते. वर्षातून एप्रिल महिन्यात खरड छाटणी तर ऑक्टोबर नोव्हेंबर दरम्यान एक छाटणी केल्या जाते. बागेसाठी फवारणी व खतांचे योग्य व्यवस्थापन त्यांनी केले असून वडील नंदकिशोर शेळके, आई गिताबाई, पत्नी वैशाली, कुटुंबातील सदस्य पूजा व आश्विनी शेळके यांचे सहकार्य त्यांना लाभत आहे.

*निसर्गाशी दोन हात करण्याबरोबरच, उत्पादनाचा वाढलेला खर्च आणि त्या तुलनेत न मिळणारे भाव तसेच निर्यातीमधील वेगवेगळ्या अडथळ्यांमुळे द्राक्ष बागायतदारांना संकटांचा सामना करावा लागतो. द्राक्षाचे पीक हे सर्वात खर्चीक आहे. त्यामुळे अतिवृष्टी किंवा गारपिटीने बागा आडव्या झाल्या तर मोठ्या प्रमाणात नुकसान होते. सन २०२० पासून द्राक्ष शेती करत असून २०२३-२४ या वर्षी बागेसाठी अडीच लाखांचा खर्च आला असून ९ लाखाचे उत्पन्न झाले आहे. शेतकऱ्यांनी नाविण्यतेचा अवलंब करत पीक पद्धतीत बदल करावो*

**– अंबादास शेळके,** द्राक्ष बागायतदार, मलगी ता.चिखली

*चिखली तालुक्यात द्राक्ष बागायतदाराचे प्रमाण पूर्वी मोठ्या प्रमाणात होते. मात्र हवामान बदलानुसार तसेच इतर संकटामुळे द्राक्ष बागेचे प्रमाण कमी झाले आहे. अंबादास शेळके यांनी फुलविलेली द्राक्ष बाग यशस्वी झाली असून याचे अनुकरण परिसरातील शेतकऱ्यांनी करावे, असे मी आवाहन करतो.*

**– ज्ञानेश्वर सवडतकर,** तालुका कृषी अधिकारी चिखली

## डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन

राज्यातील २५ लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय/ नैसर्गिक शेतीखाली आणण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अभियान राबविण्यात येते.

सदर योजना १००% राज्य पुरस्कृत असून प्रति गटाला सलग ३ वर्षात रुपये १३,२०० /- प्रति हेक्टर मर्यादित अर्थसहाय्य दिले जाते.

सदर योजनेच्या अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

### उद्देश :

- शेतकऱ्यांना प्रशिक्षण प्रोत्साहन देणे
- रासायनिक खते व किटकनाशकाचा वापर थांबविणे
- नैसर्गिक व सेंद्रिय शेतमालाची मूल्यसाखळी विकसित करणे
- जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढवून जमिनीची सुपिकता व आरोग्य सुधारणे

### स्वरुप

- गट आधारित असून ५० हेक्टर क्षेत्राचा एक गट
- १० गटांची शेतकरी उत्पादक कंपनी / संस्था
- सेंद्रिय / नैसर्गिक प्रमाणिकरण करण्यासाठी सहाय्य

# अनुकूल हवामान विकसनशील राष्ट्रांच्या शाश्वत विकासासाठी आवश्यक

हवामानाचा मानवी जीवनाशी,शेतीशी, पर्यावरणाशी,वन्यजीवांशी व सामाजिक स्थैर्याशी अनादीकाळापासून घनिष्ट परस्परसंबंध असल्याचे आपणास माहीतच आहे. अनुकूल हवामान मानवी आरोग्यास पोषक असते.परिणामी त्याठिकाणी सामाजिक स्वास्थ्य संतुलित राहते व राष्ट्र उभारणीसाठी अपेक्षित कार्यक्षमता योग्य दिशेने वाटचाल करीत असते.पर्यावरण संतुलित राहते,शेतातील पिक बहरते व वसुंधरा सुजलाम्-सुफलाम् होते.सांप्रत परिस्थिती पाहता सर्वसाधारणपणे वार्षिक हवामान प्रतिकूल असल्याचे निदर्शनास येते.त्यामुळे उपरोक्त सर्व बाबी विरोधाभास दर्शवितात.अनुकूल हवामान विकसनशील राष्ट्रांच्या शाश्वत विकासासाठी आवश्यक आहे हे जगन्मान्य सत्य आहे.शेती क्षेत्रातील अपेक्षित उत्पादन/उत्पन्न मिळविण्यासाठी शेतीतील पेरणीयोग्य जमीन तयार करण्यापासून ते कापणी,मळणी करून तयार झालेला शेतमाल साठवणूक/बाजारपेठेतील दळणवळणापर्यंत हवामान व त्याचे घटक(कमाल तापमान,किमान तापमान,वाऱ्याचा ताशी वेग,वाऱ्याची दिशा,आर्द्रता,पर्जन्यमान,आकाशाची अवस्था-निरभ्र/ढगाळ आणि प्रखर सूर्य किरणांचा प्रती दिवसातील कालावधी ई.)प्रत्येक कृती प्रभावित करीत असतात.या सर्व बाबींचा उहापोह जागतिक हवामान दिनाच्या औचित्याने लेखणीतून आपणापर्यंत सादर...२३ मार्च या जागतिक हवामान दिनाच्या पर्वावर सुज्ञ,सुसंस्कृत आणि जबाबदार भारतीय नागरिकांशी संवाद करण्याचा हा कयास.



**आज जागतिक हवामान दिन**

**मनेश पुंडलिकराव यदुलवार**
कृषी हवामान तज्ञ,
कृषी विज्ञान केंद्र,बुलढाणा
मो :-९८८१३४४०६८

### जागतिक स्तरावरील हवामानाच्या सद्यस्थितीवरील प्रस्तुत आढावा

पावसाचा विविध देशातील आलेख पाहता असे लक्षात येते की, त्यामुळे राष्ट्रांच्या आर्थिक विकासावर निश्चित परिणाम झालेला आहे. कार्बनडाय ऑक्साईड चे उत्सर्जन २०१९ मध्ये जगात ०.६ % वाढले असल्याचे दिसून येते. जगातील ७० देशांनी जाहीर केले कि ते २०५० पर्यंत कार्बनडाय ऑक्साईड चे उत्सर्जन नियंत्रणात आणतील. याच धर्तीवर बऱ्हांशी औद्योगिक क्षेत्रे, शहरे पावले उचलायला सरसावली आहेत. ग्रीनलँड आणि अंटार्क्टिका येथील बर्फ वितळत असल्यामुळे समुद्रातील पाण्याची पातळी वाढत आहे हे १९९३ पासून उपग्रह प्रतिमेद्वारे सर्वज्ञात आहे.२०१९ यावर्षी वैश्विकस्तरावर समुद्रातील पाण्याच्या पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे.

हवामान बदल,वाढते वैश्विक तापमान आणि नैसर्गिक आपत्ती या त्रयींमुळे जगाच्या पाठीवरील लोकसंख्येस अन्नधान्य पुरवठा पुरेसा होऊ शकत नाही आणि हेच सध्या जगापुढे एक मोठे संकट आहे.२०१८ च्या अहवालानुसार जगामध्ये ८२० दशलक्ष जनसंख्या भुकेली आहे.३३ देशांपुढे हि एक भीषण समस्या आहे. जग शाश्वत विकासाकडे वाटचाल करीत असताना जागतिक समुदायापुढे अपुरे अन्न हे एक चिंतनीय आव्हान आहे.

### हवामान बदल आणि नैसर्गिक आपत्तीमागील कारणमीमांसा

औद्योगिकीकरण, जंगलतोड, शेतीमध्ये रासायनिक खतांचा, कीटकनाशकांचा, तणनाशकांचा अवास्तव, असंतुलित वापर, हरितगृह वायूंचे उत्सर्जन, बेभरवशाचा व वर्षानुवर्षे कमी होत असलेला पाऊस, जलसंवर्धनाचा अभाव ई.मुळे हवामान बदल व अचानक येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींची वारंवारता वाढलेली आहे. हवामान बदलामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडले नाही तर पर्यावरणच धोक्यात आले आहे, असं मी म्हणेन.पर्यावरणाची ही असंतुलित अवस्था पूर्ववत करण्यासाठी आपल्यातील ‘‘माझ्या’’पासूनच सुरुवात करायला हवी.कारण आपल्यातला ‘मी’ जर पुढे सरसावला तर एका लक्ष्यवेधी कार्यक्षम पर्यावरणप्रेमी शिखरसंस्थेचा उगम होण्यास विलंब होणार नाही व जगापुढे,राष्ट्रापुढे उभं असलेलं हे हवामान बदलाचं-नैसर्गिक आपत्तीचं,अन्न-धान्याच्या अभावाचं,सामजिक स्वास्थ्याचं आव्हान संपुष्टात येण्यास निश्चितच मदत होईल.

जगातील अनेक राष्ट्रांवर ज्यावेळी अस्मानी संकटे कोसळलीत, त्या त्या वेळी त्या त्या राष्ट्रातील नागरिकांनी तेथील शासनास,प्रशासनास केलेले सकारात्मक सहकार्यच फलदायी ठरले आहे. म्हणून राष्ट्रापुढे उभे ठाकलेले वर नमूद केलेले ज्वलंत प्रश्न निवारण्यासाठी जनमाणसाची भूमिका ही समाजहित जोपासणारी असावी. सामान्यत: असे अनेक प्रश्न/समस्या आपण शासनावर सोडून देतो, परंतु देशाचे एक सुजाण नागरिक म्हणून आपलीही काही कर्तव्ये आपणास पार पाडायची आहेत ना?

हवामान बदलावर मात करण्यासाठी सर्वप्रथम कृषी क्षेत्रामध्ये एकात्मिक पिक व्यवस्थापन पद्धतीचा (रासायनिक व जैविक खतांचा संतुलित वापर,जैविक-रासायनिक कीटकनाशकांचा योग्य प्रमाणात वापर,अन्नद्रव्यांचे सुयोग्य व्यवस्थापन,हवामान अनुकूल वाणांची निवड,मृद आणि जल संवर्धनासाठी जमिनीला अनुरूप पद्धतींचा अवलंब ई.) अवलंब करणे आवश्यक आहे.त्याचबरोबर शहरात अधिवास करणाऱ्या नागरिकांनी आपल्या दैनंदिन कृतीतून प्रदूषणाला आळा कसा घालता येईल याकडे सुद्धा लक्ष देणे गरजेचे आहे.शासनस्तरावर पुढील ५० वर्षात हवामान परिस्थिती काय असेल व त्यावेळची लोकसंख्या या दोन प्रमुख बाबी लक्षात घेऊन शहरीकरण,स्मार्ट सिटी प्रकल्प,औद्योगिक वसाहतींचे निर्माण,शैक्षणिक संकुलाचे निर्माण,कृषी मालासाठी हब,पर्यटनस्थळांचा विकास या सर्वांचे सुयोग्य नियोजन अपेक्षित आहे.

# राज्याबाहेरील शेतकरी अभ्यास दौरा उत्साहात

बुलढाणा/प्रतिनिधी

कृषी विज्ञान केंद्र, बुलढाणा आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्याबाहेरील शेतकरी अभ्यास दौऱ्याचे १८ ते २० मार्च दरम्यान आयोजन करण्यात आले होते. या दौऱ्याच्या अनुषंगाने हैद्राबाद येथील राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था व राष्ट्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था येथे विविध प्रयोगशाळा व प्रक्षेत्राला भेटी देण्यात आल्या.



दरम्यान राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्था येथील डॉ. उदया भानू (वनस्पती रोग शास्त्रज्ञ) यांनी ड्रोन फवारणी, जैविक कीडनाशकांची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली. त्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांपुढे राष्ट्रीय वनस्पती आरोग्य व्यवस्थापन संस्थेच्या शेतकरी हितार्थ कार्याचे सादरीकरण केले. तसेच राष्ट्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था येथील डॉ.श्रीकृष्ण (उद्यानविद्या शास्त्रज्ञ) यांनी अत्याधुनिक फळबाग लागवड तंत्रज्ञान, सूक्ष्म सिंचन पद्धतीची कार्यपद्धती, चारा पिके व त्याविषयी सखोल मार्गदर्शन शेतकऱ्यांना केले. प्रसंगी शेतकऱ्यांना राष्ट्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था यांच्या अखत्यारीत असलेल्या एकूण ७५० एकरवरील प्रक्षेत्र प्रत्यक्षात पाहण्याची संधी मिळाली. यावेळी कृषी विज्ञान केंद्र ,बुलढाणाचे प्रतिनिधी म्हणून कृषी शास्त्रज्ञ प्रवीण देशपांडे, मनेश यदुलवार तसेच जिल्ह्यातील विविध तालुक्यातील शेतकरी बांधव या राज्याबाहेरील अभ्यास दौऱ्यामध्ये सहभागी होते.

# शेतकऱ्यांनो अशी घ्या, फळे आणि भाजीपाला पिकाची काळजी..

*भारतीय हवामान खात्याने शुक्रवारी वर्तविलेल्या पाच दिवसीय हवामान अंदाजानुसार बुलढाणा जिल्ह्यात येत्या पाच दिवसांत कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे.*



**कृषि सल्ला :** सध्याची हवामान परिस्थिती लक्षात घेऊन कापणी केलेल्या धान्याला २ ते ३ दिवस उन्हात वाळवावे. धान्यातील दाण्यात १०% पेक्षा जास्त ओलावा राहू नये याची साठवणुकीच्या वेळी काळजी घ्यावी.

परिपक्व झालेल्या हरभरा पिकाची त्वरित कापणी कोरडे हवामान असताना करावी व त्याची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

**भुईमूग :** उन्हाळी भुईमुंगावर पाने पोखरणारी अळी किंवा तुडतुड्यांचा प्रादुर्भाव दिसताच लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५% भुईमूग ४ मिली/१० ली. पाणी किंवा क्विनॉल्फॉस २५% २८ मिली/१० ली. पाणी याप्रमाणात फवारणी करावी. पिकाला आऱ्या अवस्थेमध्ये मातीची भर द्यावी जेणेकरून शेंगांची वाढ चांगली होण्यास मदत होईल.

**सूर्यफूल :** सुर्यफुल पिकामध्ये तुडतुडे, फुलकिडींचा प्रादुर्भाव आढळून आल्यास त्याच्या नियंत्रणासाठी ईमिडाक्लोप्रिड १७.८% कीटकनाशकाची २.० मिली/ १० ली. पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**गहू :** वेळेवर पेरणी केलेल्या गव्हाचे पिक परिपक्व झाले असल्यास त्याची कापणी करून मळणी करावी. मळणी करताना दाणे फुटणार नाहीत याची काळजी घ्यावी. मळणी केल्यानंतर तयार झालेल्या शेतमालाची सुरक्षितठिकाणी साठवून ठेवण्याची व्यवस्था करावी.

**फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:**

**कागदी लिंबू :** लिंबूच्या झाडांवर होणाऱ्या डिंक्या रोगाच्या नियंत्रणासाठी लिंबू झाडाच्या बुंध्याला १ मीटरपर्यंत बोर्डो पेस्ट लावावी.

**वांगे :** वांगीवरील तुडतुडे, मावा व पांढरीमाशी या किडींच्या नियंत्रणासाठी फॉस्पेमीडॉन ४०% एस.एल. १५मिली किंवा फेनप्रोपॅथ्रीन ३०% ई.सी. ५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**मिरची :** मिरची पिकावरील शेंडेमर व फळसड रोगाच्या नियंत्रणाकरिता डायफेनकोनॅझॉल २५ ईसी ५ मिली १० लिटर पाण्यात किंवा अँझोक्झायस्ट्रोबिन २३ ईसी १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी वाऱ्याच्या दिशेने करावी.

## बाजारभाव

**दिनांक : २२ मार्च २०२४**

खामगाव बाजार समिती (प्रति क्विंटल)

| शेतमाल | किमान भाव | कमाल भाव |
|---|---|---|
| गहू | २०७८ | २८०० |
| हरभरा | ४२५० | ५६०० |
| मका | १७०० | १९६५ |
| सोयाबीन | ४०५० | ४४०० |
| तुर | ६१०० | १०३५० |
| ज्वारी | २००० | २१५० |


# तुती लागवड, रेशीम कीटकांचे संगोपन

तुतीच्या जोमदार वाढीसाठी तापमान तेरा ते चाळीस अंश सेल्सिअस आणि सूर्यप्रकाश नऊ ते तेरा तास योग्य आहे. परंतु उन्हाळ्यात या वातावरणीय बाबींमध्ये वाढ झाल्यामुळे तुती पाल्याचे उत्पादन आणि दर्जा यावर परिणाम होऊ शकतो.

तुती लागवडीचा हंगाम जून ते सप्टेंबर असा आहे परंतु अलीकडच्या काळात वाढत्या कोषांच्या बाजारभावामुळे शेतकरी उन्हाळ्यात देखील तुती लागवड कलमे किंवा रोपाच्या साह्याने करत आहेत. या ठिकाणीच तुती लागवडीची फसगत होते, कारण उन्हाळ्याच्या तडाख्यामुळे कलमे सुकून जातात त्याचबरोबर रोपेदेखील सुकून जाण्याची शक्यता असते.

काही शेतकरी या कालावधीत तुती रोपवाटिका करण्याचे प्रयोजन करतात. त्यांना देखील जिवंत तुती रोपांच्या पुरेशा संख्येच्या समस्येला सामोरे जावे लागते. या सर्व गोष्टी टाळायचे असतील तर तुतीची लागवड जून ते सप्टेंबर या कालावधीत करावी.

जून ते सप्टेंबर या कालावधीत नव्याने तुती लागवड केलेल्या शेतकऱ्यांनी ऑक्टोबर त्याचबरोबर उन्हाळ्यातील काही महिन्यांमध्ये तुती झाडांची योग्य काळजी घेणे गरजेचे आहे.



उन्हाळ्यात तुती बागेला सकाळी किंवा दुपारनंतर पाणी द्यावे. दुपारी पाणी दिल्यास उन्हामुळे जमीन तापलेली असते, पाणी गरम होऊन तुतीच्या मुळावर उष्णतेचा त्रास होऊन मुळांची कार्यक्षमता कमी होते.

तुती बागेत आच्छादन करावे. याशिवाय या काळात ठिबक सिंचन संचाचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर केल्यास पाण्याची बचत होते. तुती बागेमध्ये तण वाढणार नाही याची काळजी घ्यावी. तुती लागवड करून एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी.

तुती लागवड जुनी झाल्याने मुळे जमिनीत खोलवर रुजल्यामुळे उन्हाळ्याचा तितकासा परिणाम होत नसला तरी योग्य उपाययोजना करावी. ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता कमी आहे अशा शेतकऱ्यांनी किमान पंधरा दिवसातून एकदा पाणी द्यावे.

उन्हाळ्यात तुती पानावर धूळ मोठ्या प्रमाणात पसरल्याचे दिसून येते. अशावेळी तुषार सिंचनाचा वापर केल्यास पानावरील धूळ निघून जाण्यास मदत होते.

## रेशीम कीटक संगोपन

अंडीपुंजाची वाहतूक दुपारच्या रखरखत्या उन्हात केल्यास अंड्यातील उपलब्ध पाण्याचे प्रमाण कमी होते. परिणामी गर्भ कमकुवत होणे, हॅचिंग कमी होणे, एकाच वेळेस हॅचिंग न होणे यासारखे प्रकार घडतात. हे टाळण्यासाठी अंडीपुंजाची वाहतूक सकाळ किंवा संध्याकाळ करावी. सुती पिशवी पाण्याने ओली करून पाणी पिळून निथळल्यावर त्या पिशवीमध्ये अंडीपुंजाची वाहतूक करावी. केंद्रीय रेशीम मंडळाने यासाठी विशेष पिशवीची निर्मिती केली आहे.

केंद्रांकडून दोन अवस्था पूर्ण झालेले रेशीम कीटक मिळाल्यानंतर उर्वरित तीन अवस्था चॉकीपेक्षा मोठ्या संगोपन घरात रॅकवर फांदी पद्धतीने केले जाते. कीटकांच्या चांगल्या वाढीसाठी तिसऱ्या अवस्थेसाठी २६ अंश सेल्सिअस, चौथ्या अवस्थेसाठी २४-२५ अंश सेल्सिअस आणि पाचव्या अवस्थेसाठी २४-२६ अंश सेल्सिअस तापमान पोषक असते. कीटक संगोपन गृहास पुरेशा खिडक्या तसेच भिंतीच्यावरील व खालील बाजूने बाहेरील थंड हवा आत येणे आवश्यक असते.



कीटक संगोपन ग्राहक सिमेंटच्या कोबा असेल तर भिंतीच्या चारी बाजूने नाली काढून त्यामध्ये पाणी साठवून ठेवल्यास खालच्या बाजूचे व्हेंटिलेटर मधून बाहेरील हवा आत येताना थंड होऊन तापमान कमी होण्यास मदत होते. हे शक्य न झाल्यास ग्रहाच्या आतील चारही भिंतीच्या बाजूने वाळूचे बेड तयार करून त्यावर दिवसभरात वेळोवेळी पाणी शिंपडल्यास चांगल्यापैकी गारवा राहतो.

छतावर उसाचे पाचट, गवताच्या पान कणसाच्या पेंढ्यांचा एक दीड फूट भर द्यावा. संगोपन गृहाभोवती चारही बाजूंनी शेडनेटच्या बाहेरच्या बाजूने बारदाना लावून दिवसातून तीन ते चार वेळेस बारदाना पाण्याने ओला केल्यास शेडमधील तापमान कमी होण्यास मदत होते.

सकाळ, दुपार, संध्याकाळची कीटक संगोपनगृहातील तापमान व आद्रतेची नोंद लेखी स्वरूपात कागदावर ठेवणे गरजेचे आहे.

उन्हाळ्यात विक्री योग्य कोषांची वाहतूक पातळ बारदान्यात भरून सकाळ किंवा संध्याकाळच्या वातावरणात करावी.

**– संजय फुले, पुणे**

## थोडक्यात

### दारू बाळगणाऱ्या दोघांना अटक

**खामगाव :** वेगवेगळ्या कारवाईत अवैधरित्या दारू बाळगणाऱ्या दोघांना पोलीसांनी ताब्यात घेऊन त्यांच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तालुक्यातील पारखेड फाटा येथे २१ मार्च रोजी दुपारी ४.३० वाजताच्या सुमारास मनोज श्रावण नाईक ३५ रा. इंदिरा नगर सुटाळा बु. याच्याजवळून पोलिसांनी हातभट्टीची ९ लिटर दारू व कैन जप्त केली. याप्रकरणी पोहेकॉ देवराव धांडे यांनी खामगाव ग्रामिण पोस्टेला फिर्याद दिली. फिर्यादीवरून उपरोक्त आरोपीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. तर दुसऱ्या घटनेत पिं. राजा पोस्टे हद्दीतील मांडका येथे २१ मार्च रोजी दुपारी ५ वाजताच्या सुमारास रोशन संगपाल वानखडे रा.मांडका हा विनापरवाना देशी दारू बाळगतांना मिळून आला. त्याचेजवळून ९० मिलीच्या ९ शिशा व थैली असा एकुण ४६० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

### पतीकडून पत्नीवर चाकु हल्ला; विवाहिता गंभीर

**खामगाव :** एका युवकाने पत्नीवर चाकू हल्ला करुन तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केला. यात विवाहिता गंभीर जखमी झाल्याची घटना २१ मार्च रोजी दुपारी स्थानिक जिया कॉलनी भागात घडली.

शिरीन परवीन शेख सादीक २५ हिने पती विरुध्द शहर पोस्टेला तक्रार दिलेली असून तक्रारीत नमूद आहे की विवाहिता सध्या खामगाव येथे माहेरी राहते. दरम्यान २१ मार्च रोजी ती व तिची आई चौकशी कामी पोलीस स्टेशनला जाण्यासाठी घरुन निघाल्या होत्या. यावेळी तिचा पती शेख सादीक शेख मुस्ताक रा. जळगाव जामोद हा ऑटो घेवून आला व त्याने सौ. शिरीन व तिच्या आईला बळजबरीने ऑटोत बसविले व त्याने शिरीनवर चाकु हल्ला करून जखमी केले. या प्रकरणी आरोपी पती विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अवैधरित्या रेती वाहणारे ट्रॅक्टर पकडले

**खामगाव :** मागील काही दिवसांपासून जिल्हाभरात महसूल प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून रेती तस्करी करणाऱ्यांवर कारवाया केल्या जात आहेत. दरम्यान २१ मार्च रोजी वडनेर भोलजी ते निंबोळा देवी संस्थान रोडवर तलाठ्याने अवैधरेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडले आहे.

### निधन वार्ता

#### रतनसिंग बोराडे



**मोताळा :** तालुक्यातील वारुळी येथील रहिवासी रतनसिंग अजाबसिंग बोराडे यांचे शुक्रवार २२ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६७ वर्ष होते. त्यांच्या पश्चात दोन मुली, एक मुलगा, सुना असा आप्त परिवार आहे.

---

गोणीवरील मोदींच्या फोटोने वाढविली शेतकऱ्यांची चिंता..

# निवडणूक आचार संहितेच्या बंधनात अडकली खतांची विक्री

खामगाव/प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने देशभरात आदर्श आचारसंहिता जारी झाल्याने अनेक बंधने लादली गेली आहेत. आचार संहितेचा बडगा बळीराजाला देखील सहन करावा लागत आहे. उन्हाळी पिकांसाठी लागणाऱ्या खतांच्या गोणीवर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोंदींचा फोटो असल्याने ' नको ती आचार संहितेची भानगड' असे म्हणत, कृषी केंद्रांकडून शेतकऱ्यांना खताची विक्री करणे थांबविण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली असून कृषी विभागाने या संदर्भात त्वरित पर्यायी व्यवस्था करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होऊ लागली आहे.




**मोदींचा फोटो छापलाच कशाला?**

*खताच्या गोण्यांवरील पंतप्रधान मोदी यांच्या छायाचित्राला रंग लावायलाही दुकानदार धजत नाहीत. रंग लावून छायाचित्र झाकले तर त्याला वेगळाच रंग येण्याची भीती असल्याने संबंधित कंपन्यांनीच विक्रेत्यांना स्टिकर पुरवावीत. विक्रेते ते गोण्यांवर लावून खत विक्री करतील किंवा निवडणूक आयोगाने पर्याय काढावा, अशी विनंती खत विक्रेत्यांकडून करण्यात येत आहे. आचारसंहितेच्या कक्षेत खतांना आणायचे होते तर फोटो छापलाच कशाला? असा सवालही खत विक्रेत्यांकडून होत आहे.*

सद्या पिकांना खताची गरज आहे. मात्र, रासायनिक खते असलेल्या प्रत्येक गोण्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र असल्याने नेमके काय करावे, असा प्रश्न विक्रेत्यांना पडला आहे. स्टिकर लावून छायाचित्र झाकायचे असेल तर संबंधित कंपन्यांनीच स्टिकर पुरवावीत, असे विक्रेत्यांचे म्हणणे आहे. जर हा खर्च विक्रेत्यांवर लादण्यात आल्यास विक्रेत्यांवर अतिरिक्त खर्चाचा भुर्दंड लागणार आहे.

केंद्र सरकारच्या खत विभागाने देशात भारत या एकाच नावाखाली विविध खतांचा पुरवठा करण्याच्या सूचना संबंधित कंपन्यांना दिली आहे. त्यानुसार गेल्या वर्षीपासून कंपन्यांकडून खतांच्या गोण्यांवर पंतप्रधानांचे छायाचित्र असलेल्या खताचीच विक्री होत आहे. लोकसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागू झाल्यावर कोणत्याही राजकीय व्यक्तीचे छायाचित्र अथवा मतदारांवर प्रभाव पडेल, असा मजकूर असल्यास त्यावर स्टिकर लावून ते झाकूनच संबंधित वस्तूची विक्री करण्याचे आदेश आयोगाने जिल्हाधिकारी व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिला आहे. त्यात खत गोण्यांचाही समावेश आहे. स्टिकर लावल्याचे आढळले नाही अथवा कोणाची तक्रार आली तर संबंधित दुकानदारांवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. सद्या खत विक्रेत्यांकडे खतांचा हजारो टन साठा उपलब्ध आहे. उसाला मात्रा देण्यासाठी शेतकरी खतांची मागणी करीत आहेत.

विक्रेत्यांकडे स्टीकर नाहीत. बाजारातून अशी स्टिकर विकत आणणे दुकानदारांना परवडत नाहीत. त्यामुळे विक्रेत्यांसमोर अडचण निर्माण झाली आहे. संबंधित कंपन्यांनी छायाचित्रांवर स्टिकर लावण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी विक्रेते करीत आहेत. दरम्यान आचारसहिंतेमुळे शेतकऱ्यांना विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे.

---

## शिक्षकांना अतिरिक्त ठरविणारा शासन आदेश रद्द करा

### जिल्हा शिक्षक भारती व विजुक्टाची मागणी



खामगाव/प्रतिनिधी

संच मान्यतेचे सुधारित निकष विहित करणारा शासन निर्णय आरटी कायद्याशी विसंगत असून हजारो शिक्षकांना अतिरिक्त ठरविणारा तसेच दुर्गम भागातील शाळा बंद करणारा आहे. त्यामुळे शासनाने सदरचा अन्यायकारक निर्णय तात्काळ रद्द करण्याची मागणी २१ मार्च रोजी जिल्हा शिक्षक भारती व विजुक्टाच्यावतीने जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल अकाळ यांच्या माध्यमातून शासनाकडे एका निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

या संदर्भात दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, शासनाने १५ मार्च २०२४ ला दुर्गम भागातील शाळांवर अन्याय करणारा आदेश काढला. हा आदेश विद्यार्थ्यांना कला, क्रीडा ,संगीत विषय शिकवण्याचा अधिकार नाकारणारा असल्याने सदर आदेश रद्द करावा या मागणीसह शासनाने शिक्षण सेवक, कंत्राटीकरण रद्द करून वेतन, पेन्शन ,कॅशलेस आरोग्याच्या सुविधा द्याव्या,शिक्षकांना शाळाबाह्य कामे देऊ नये , दहा टक्के मागणीची अट रद्द करावी. अन्यायकारक आदेशामुळे शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे शासनाने हा आदेश त्वरित रद्द करावा व हजारो शिक्षकांना न्याय द्यावा असे निवेदनात नमूद आहे. निवेदनावर शिक्षक भारतीचे उपाध्यक्ष प्राचार्य गजानन सपकाळ, मोताळा तालुका उपाध्यक्ष तानाजी ठोंबरे, विज्युक्टा संघटनेचे प्राचार्य शिवराम बावस्कर, इरफान, बोर्डे, एस. आर. काटकर,लहाने, तालुका अध्यक्ष प्रल्हाद कानोडजे, देऊळगाव राजा तालुका अध्यक्ष प्रा. इंद्रजीत सोनपसारे तसेच शिक्षक भारतीचे जिल्हा पदाधिकारी, तालुका पदाधिकारी व शिक्षक बांधव यावेळी हजर होते.

---

## बोहल्यावर चढण्याआधीच तीन लाखाची मागणी करणाऱ्या नवरोबावर गुन्हा दाखल

नांदुरा/प्रतिनिधी

लग्न ठरलं, साखरपुडा झाला, लग्नाच्या निमंत्रण पत्रिका नातलगांकडे पोहोचल्या आणि लग्नघटीका जवळ आली अन नवरदेवाने चक्क नवरीच्या पित्याकडे तीन लाख रूपये हुंड्याची मागणी केल्याने सगळं विचकल. लग्नाच्या तोंडावर अचानक नवरदेवाने हुंड्याची मागणी केल्याने नवरीच्या पित्याने चक्क पोस्टेला धाव घेतली. वधू पित्याच्या तक्रारीवरून पोलिसांनी या प्रकरणी लालची नवरदेवासह पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल केल्याची घटना नांदुरा तालुक्यातील वडी येथे घडली.

चिखली येथील रहिवाशी नेहल किसनराव शेळके याचा नांदुरा तालुक्यातील वडी येथील महादेव उखर्डा चिमकर यांच्या मुलीशी विवाह ठरला. धुमधडाक्यात साखरपुडाही पार पडला. वधू पित्याने साखरपुडयात नवरदेवाला ५ ग्रॅमची सोन्याची अंगठी दिली. लग्नाची तारीख ठरविण्यात आली. लग्नासाठी वधू पित्याने जोरदार तयारी सुरु केली. महागडा बॅन्ड बुक केला. पत्रिका छापून पाहुण्यांना वाटल्या. अशी सगळी लगनघाई सुरु असतांना नवरा मुलगा नेहल शेळके याने नवऱ्या मुलीला फोन करुन 'तुझ्या बापाने मला तीन लाख दिले नाही तर मी लग्न करणार नाही' असे सांगितले. हे ऐकून मुलगी आश्चर्यचकीत झाली. तिने हा प्रकार वडिलांना सांगितला. तिच्या वडिलांनी मध्यस्थी असलेल्या लोकांच्या कानावर ही गोष्ट टाकली. मात्र नवरदेवाकडील मंडळी काहीच ऐकून घ्यायला तयार नसल्याने वधूपिता महादेवराव उखर्डा चिमकर यांनी नांदुरा पोस्टेला तक्रार दिली यावरून पोलिसांनी नवरा मुलगा नेहल किसनराव शेळके, गोकर्णाबाई किसन शेळके, प्रकाश किसन शेळके, अमोल किसन शेळके व कुशल किसन शेळके यांच्या विरुध्द हुंडा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

---

## जलजीवन निबंध स्पर्धेत कोऱ्हाळा बाजार शाळेचा डंका

### सिध्दांत घोतीने पटकाविले जिल्हास्तरीय २१ हजाराचे प्रथम बक्षीस

मोताळा/प्रतिनिधी



जलजीवन मिशन अंतर्गत 'पाणी वाचवा' या विषयावर जनजागृती करण्यासाठी चित्रकला, निबंध, वक्तृत्व, लघुपट स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या होत्या. याचा स्पर्धांत निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. यामध्ये जलजीवन निबंधव स्पर्धेत जिल्हा परिषद कोऱ्हाळा बाजार शाळेच्या सिध्दांत घोती याने २१ हजाराचे जिल्हास्तरीय प्रथम बक्षीस पटकाविले आहे.

तालुक्यातील कोऱ्हाळा बाजार जि.प.मराठी उच्च प्राथमिक शाळा नेहमी नवनवीन उपक्रम, गुणवत्ता इत्यादी बाबत नेहमी अग्रेसर आहे. जलजीवन मिशन अंतर्गत 'पाणी वाचवा' या विषयावर घेण्यात आलेल्या जलजीवन निबंध स्पर्धेत प्राथमिक गटामधून सिद्धांत मनोज घोती हा विद्यार्थी निबंध स्पर्धेत प्रथम येवून त्याने २१ हजाराचे बक्षीस पटकाविले आहे. त्याचा २२ मार्च रोजी ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र बुलढाणा येथे मोताळा पं.स.गटविकास अधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत सिध्दांत याचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जलजीवन मिशनचे शाळेचे माजी मुख्याध्यापक भागवत शेळके, मनोज घोती,संजय शिंदे,अशोक राजनकर, वर्षा राजनकर,अशोक राजनकर उपस्थित होते. यशाबद्दल सिध्दांत घोतीचे शाळेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, शहाजी बोरसे मुख्याध्यापक, नितीन राणे, दीपक चौधरी, अजय बावस्कर, राजेंद्र पाटील, सुनंदा जेऊघाले-खेडेकर यांनी कौतूक केले.

---

## दिव्यांग पी.डब्ल्यू.डी. 'आयकॉन' म्हणून वैभव संबारे

खामगाव/प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक पूर्व तयारीच्या दृष्टीने मतदार नोंदणी व जनजागृतीसाठी खामगांव विधानसभा मतदार संघामध्ये भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार दिव्यांग पीडब्ल्यूडी आयकॉन म्हणून वैभव गजानन संबारेची यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सुटाळा बु. येथील रहिवासी असलेले संबारे हे उत्कृष्ट दिव्यांग खेळाडू असून, राज्यस्तरीय पॅरा ऑलंपिक दिव्यांग क्रिडा स्पर्धेमध्ये त्यांनी भालाफेक, थाळीफेकमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन केले आहे. २१ मार्च रोजी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.रामेश्वर पुरी




यांच्याहस्ते त्यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार विजय पाटील तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वैभव संबारे यांना लोकसभा निवडणूकीत मतदार नोंदणी व जनजागृती बाबत काम करावे लागणार आहे.

---

## काळ्या बाजारात विक्रीसाठी जाणारा ५४३ कट्टे तांदुळ पकडला

### आरोपीकडून २८ लाख ८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत..

शेगावर/प्रतिनिधी

काळ्या बाजारात विक्रीसाठी जात असलेला ५४३ कट्टे तांदळाचा ट्रक अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या पथकाने पकडल्याची घटना २१ मार्च रोजी कालखेड रोडवरील राधा स्वामी सत्संग गेट समोर घडली. यावेळी पोलिसांनी २८ लाख ८ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीसांनी त्यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरून कालखेड रोडवर सापळा रचला. यावेळी भोनगांवकडून ट्रक क्रमांक एम एच ३० बि डी २४७९ ला



थांबवून तपासणी केली असता ट्रकमध्ये तांदुळाने भरलेले ५४३ कट्टे आढळले. भरलेल्या ट्रकची पंचा समक्ष पाहणी केली असता त्यामध्ये पांढऱ्या, पिवळ्या, बदामी अशा विविध रंगाच्या प्लास्टीक पिशव्यामध्ये ५४३ कट्टे वजन अंदाजे २९ हजार ९५० किलो, प्रति किलो २७ रुपये प्रमाणे एकुण ८ लाख ८ हजार ६५० रुपयेचा रेशनचा तांदुळ तसेच ट्रक क्रमांक एम एच ३० बि ही २४७९ किंमत अंदाजे २० लाख असा एकुण २८ लाख ८ हजार ६५० रुपयाचा मुद्देमाल मिळून आला. अधिक तपास सुरू आहे.

---

## जुगार अड्ड्यावर छापा;दहा जणांविरूध्द गुन्हा दाखल

शेगाव/प्रतिनिधी

खामगाव एसडीपीओ पथक व एलसीबी पोलिसांनी २१ मार्च रोजी शेगाव तालुक्यातील चिंचोली व जवळा बु. शिवारात जुगारावर छापा मारून १० जणांविरूध्द कारवाई केली आहे.

पहिल्या घटनेत एसडीपीओ पथकाने २१ मार्चच्या दुपारी ४.५५ वाजताच्या सुमारास चिंचोली शिवारातील गजानन जवंजाळ यांच्या शेतात सुरू असलेल्या एक्का बादशहा नावाच्या जुगारावर छापा मारला. यावेळी शिवाजी वामनराव पटोकार रा.मंगलम नगर शेगाव, शे. इकबाल शे. दिलदार रा. जमादार नगर शेगाव, वासुदेव नामदेव बोंद्रे रा. निंबी ता. बाळापुर गजानन नामदेव सरदार रा. सवर्णा ता. शेगाव व अनिल भारत बोदडे रा. गौलखेड ता. शेगाव यांना जुगार खेळतांना नगदी ८ हजार रू., ताशपत्ता व ३ मोबाईल असा एकुण १५ हजार ४० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोहेकॉ. सुधाकर थोरात यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. तर दुसऱ्या घटनेत एलसीबी पथकाने २१ मार्चच्या दुपारी ५ वाजताच्या सुमारास जवळा बु शिवारात सुरू असलेल्या एक्का बादशहा जुगारावर छापा मारला. यावेळी योगेश देविदास तलवारे, योगेश श्रीकृष्ण शेळके, आनंदा राजाराम उमाळे, पुष्पाकर सुधाकर शेगोकार व एकनाथ विश्वनाथ यरुळकर यांना जुगार खेळलांना रंगेहाथ पकडले.

---


अश्लिल व्हायरल व्हिडीओंनी खामगावकरांची उडाली झोप

## महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

खामगाव/प्रतिनिधी

शहरातील काही उच्चभ्रू घराण्यातील महिलांचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. त्याच पाठोपाठ काही मुलींचे सुद्धा अश्लील व्हिडिओ सुद्धा समोर आले असल्याने शहरातील महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. या प्रकारामुळे शहराची सर्वत्र बदनामी होत असून, पोलीस विभागाने या प्रकाराला आळा घालुन आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

शहराचा रजत नगरी म्हणून नावलौकिक आहे. मात्र काही विकृत प्रवृत्तींकडून महिला आणि मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्याचे अश्लील व्हिडिओ व्हायरल करत शहराच्या नावलौकिकास गालबोट लावण्याचा प्रयत्न होत आहे. प्रेमाच्या भुलथापा देवून काही विवाहिता आणि महाविद्यालयीन मुलींचे तसले व्हिडओ काढून त्यांना ब्लॅकमेल करण्याचे प्रकार अलीकडील काही दिवसात वाढले आहेत. ज्या हेतूसाठी असा प्रकार केला जातो तो साध्य न झाल्यास प्रेमाच्या जाळ्यात अडकलेल्या महिला व मुलींचे अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करून त्यांची बदनामी केली जाते.. काही दिवसा पूर्वी शहरातील एका उच्चभ्रू महिलेसह काही महाविद्यालयीन विद्यार्थिनींचे सुद्धा एकापाठोपाठ पाच ते सहा व्हिडिओ शहरात व्हायरल झाले होते. व्हाईरल झालेल्या अश्लील व्हिडिओपैकी काही व्हिडिओंबाबत पोलीस प्रशासनाने चौकशी केली असून, व्हिडिओ व्हायरल करणाऱ्यांचा शोध पोलीस घेत असल्याची माहिती आहे. तर व्हिडिओ शोध मोहीम अंतर्गत पोलिसांनी काहींना चोप दिल्याचीही चर्चा आहे. अश्लील व्हिडिओमुळे महिला व विद्यार्थिनींचे आयुष्य उध्वस्त होत असल्याने पोलीस प्रशासनासह सर्वसामान्य नागरिकांनीही विकृतांना धडा शिकविण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.



**विद्यार्थिनींनी सजग राहणे गरजेचे**

*विवाहित महिला आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींना खोट्या प्रेमाच्या जाळ्यात ओढल्या जाण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे महिला आणि मुलींनी ओळखीच्या अथवा अनोळखी युवक अथवा इसमांवर विश्वास ठेवू नये. आपल्याशी लगट साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या बाबत खात्री करून स्वत:चा बचाव करणे गरजेचे आहे. महिला आणि विद्यार्थिनींनी त्यांचा पाठलाग करणाऱ्याबाबत पोलिसांना अथवा नातेवाईकांना माहिती देणे ही गरजेचे आहे.*

**व्हिडिओ व्हायरल करणे गुन्हा : एएसीपी थोरात**

*अश्लिल व्हिडिओ काढणे व ते मोबाईलमध्ये ठेवून व्हायरल करणे हा एक प्रकारचा गंभीर गुन्हा असून असे व्हिडिओ काढू नये व ते व्हायरल सुद्धा करू नये. त्यामुळे ज्यांच्याही मोबाईलमध्ये हे व्हिडिओ असतील अशांवर सुद्धा पोलीस लक्ष ठेवून आहेत. अशा घटनांबाबत ज्यांना काही माहिती असेल त्यांनी पोलिसांना ही माहिती नि:संकोचपणे द्यावी, असे आवाहनही एएसपी अशोक थोरात यांनी केले आहे.*

---

### एकाची आत्महत्या



**शेगाव :** एकाने झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील नागझरी येथे उघडकीस आली. ज्ञानेश्वर दिनकर कऱ्हाळे ४२ यांनी बाभळीच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्या केली. या घटनेमुळे गावात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शेगाव शहर पोलिसांनी मर्ग दाखल केला आहे.

---

## रेल्वे भुयारी मार्गाच्या कामास प्रारंभ

खामगाव/प्रतिनिधी

शहरातील वामन नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील रेल्वेगेट कायमस्वरुपी बंद करण्यात आले असून या ठिकाणी रेल्वे भुयारी मार्गाच्या कामास २१ मार्च पासून प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे.

रेल्वे मार्ग शहरातून गेलेला असल्याने वामन नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील रेल्वेगेट अनेक वेळा बंद ठेवण्यात येत होते. यामुळे नागरिकांना बराच वेळ या ठिकाणी ताटकळत थांबावे लागत असे ही समस्या ओळखून आमदार आकाश




फुंडकर यांनी ना. नितीन गडकरी यांच्याकडे सतत पाठपुरावा करून या ठिकाणी भुयारी मार्गाची मागणी केली होती. यावरुन केंद्र सरकारच्या सेतुबंध योजनेअंतर्गत या भुयारी मार्गासाठी १५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दरम्यान या कामाला सुरूवात झाली असून याकरीता रेल्वेगेट कामपूर्ण होईपर्यंत कायमस्वरूपी बंद करण्यात आले आहे. या मार्गावरील वाहतूक ग्रामीण पोलीस स्टेशन रोड, कोठारी फैल रोड मार्गे वळविण्यात आली आहे. तरी नागरिकांनी या मार्गाचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

## श्रीक्षेत्र ढोरपगाव येथे भगवद्गीता कथेला सुरुवात

खामगाव/प्रतिनिधी

तालुक्यातील श्रीक्षेत्र ढोरपगाव येथे २१ मार्च पासून गजानन महाराज मंदिरात मुर्ती प्राणप्रतिष्ठानिमित्त हभप प्रशांत महाराज यांच्या वाणीतून संगीतमय श्रीमद् भगवद्गीता कथेला सुरुवात झाली आहे. २८ मार्चला या सप्ताहाची सांगता होणार आहे.

प्रारंभी आ.आकाश फुंडकर तर उमेश चांडक यांच्या हस्ते गजानन महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी संत गजानन महाराज ट्रस्टचे अध्यक्ष साहेबराव मुंढे, त्र्यंबक मुंढे, दिगंबर महाराज महाले, उमेश पुरी, प्रभाकर चोपडे, निरुत्ती महाराज, जयेश पातोडे, केशव गावंडे, हरिभाऊ मामांकर, सोपान आटोळे, प्रल्हाद मानकर, उत्तम मामंकर, सोपान मोडे, श्रीहरी डांगे, अरुण अंदुरकर, संतोष टिकर, गोपाळ चोपडे, उमेश



मानकर, देविदास अंदुर्कर, बळीराम चोपडे, पांडुरंग कोरडे, गजानन सावंत, भिकाजी मानकर, गणेश भातोकर आदी उपस्थित होते.




# उर्वशी करणार राजकारणात पदार्पण?



**मुंबई :** आपल्या हटके आणि लक्झरीयस लाइफस्टाइलसाठी अभिनेत्री उर्वशी रौतेला चर्चेत असते. उर्वशी रौतेला काही दिवसांपूर्वीच चर्चेत होती. त्याचं कारण तिच्या वाढदिवसाचा २४ कॅरेटचा गोल्ड केक. दरम्यान, सध्या उर्वशी ही पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. त्याचं कारण म्हणजे ती राजकारणात पदार्पण करण्याचा विचार करत आहे. उर्वशी रौतेलानं सांगितलं की तिला तिकिट मिळालं आहे, पण अजून तिनं विचार केलेला नाही. इतकंच नाही तर तिनं चाहत्यांकडे देखील याविषयी त्यांची प्रतिक्रिया मागितली आहे की तिनं राजकारणात जाऊन निवडणूक लढावी का?


उर्वशी रौतेलानं एका मुलाखतीत निवडणूकीचं तिकिट मिळाल्याचं म्हटलं आहे. तिला जेव्हा विचारण्यात आलं की तिला पॉलिटिक्समध्ये किती आवड आहे आणि ती त्याला किती फॉलो करते. तर उर्वशीनं उत्तर दिलं की ''मला आधीच तिकिट मिळालं आहे. आता मला निर्णय घ्यायचा आहे की राजकारणात जायचं आहे की नाही. मला माहित नाही की मी राजकारणात येणार की नाही, त्याचा मी अजून विचार केलेला नाही. मात्र, मला चाहत्यांकडून जाणून घ्यायचं आहे की त्यांनी मला सांगावं की मी राजकारणात प्रवेश करायला हवा की नाही. तर तुम्ही मला कमेंट सेक्शनमध्ये हे कळवू शकता. यावर तिच्या चाहत्यांनी सकारात्मक आणि नकारात्मक प्रतिक्रिया दिल्या आहेत.

# 'आता मला श्वास घ्यायलाही भीती वाटतेय'

## रजनीकांत यांच्या वक्तव्याने उंचावल्या प्रेक्षकांच्या भुवया..

**चेन्नई :** दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील अनेक कलाकारांचे राजकारणाशी फारच जवळचे नातं आहे. यात एनटी रामाराव, जयललिता, विजय कांत, चिरंजवी, पवन कल्याण आणि कमल हसन यांसारख्या अनेक दिग्गज कलाकारांच्या नावाचा समावेश होतो. सध्या देशात लोकसभा निवडणुकीची धामधुम सुरु आहे. संपूर्ण देशभरात सात टप्प्यात निवडणुका पार पडणार आहेत. संपूर्ण देशभरात १९ एप्रिलपासून १ जून अशा सात टप्प्यात मतदान होईल. या पार्श्वभूमीवर सर्वत्र राजकीय पक्ष जोरदार प्रचार करताना दिसत आहेत. आता दाक्षिणात्य सुपरस्टार रजनीकांत यांच्या एका वक्तव्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

चेन्नईतील एका रुग्णालयाच्या नवीन शाखेच्या उद्घाटनासाठी रजनीकांत यांना आमंत्रण देण्यात आले होते. यावेळी त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना गंमतीशीर किस्सा सांगितला. त्यासोबतच त्यांनी लोकसभा निवडणुकांचा उल्लेखही यादरम्यान केला. यावेळी रजनीकांत यांनी ''सध्या देशात निवडणुकीचे वातावरण आहे. त्यामुळे अशा परिस्थितीत मला तोंड उघडायलाही भीती वाटते.'' असे म्हटले.



''यापूर्वी जेव्हा कावेरी रुग्णालय कुठे आहे, असे विचारले जायचे, तेव्हा लोक कमल हसन यांच्या घराजवळ असे सांगायचे. पण आता जेव्हा कमल हसन यांचे घर कुठे आहे, अशी विचारणा होते, तेव्हा लोक कावेरी रुग्णालयाजवळ असे सांगतात'', असे रजनीकांत मस्करीत म्हणाले. त्यापुढे त्यांनी ''मी इथे उपस्थित असलेल्या सर्व प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनाही सांगू इच्छितो की, आता तुम्ही रजनीकांतने कमल हसनशी पंगा घेतला असे काही लिहू नका. मी जे सांगितलं ती फारच सामान्य गोष्ट आहे'', असा टोलाही त्यांनी लगावला.

''मी तुम्हाला खरं सांगू तर मला इथे बोलण्याची अजिबात इच्छा नाही. पण मला दोन शब्द तरी बोला, असे सांगण्यात आले आहे. त्यावेळी मी या कार्यक्रमात मीडियाही असणार का, असे विचारले होते. त्यावर त्यांनी ठराविक मीडिया असेल, असे सांगितले होते. पण आता समोर इतके कॅमेरे पाहून मला भीती वाटत आहे. त्यात आता निवडणुकांचेही बिगुल वाजले आहे. त्यामुळे आता तर मला श्वास घ्यायलाही भीती वाटत आहे'', असेही रजनीकांत यांनी यावेळी म्हटले.

दरम्यान रजनीकांत यांच्या या भाषणाचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. सुपरस्टार रजनीकांत यांनी १९९५ मध्ये राजकारणात एंट्री केली होती. 'रजनी मक्कल मंद्रम' असे त्यांच्या राजकीय पक्षाचे नाव होते. पण त्यांनी कधीही निवडणूक लढवली नाही.

***

# दिल्ली कॅपिटल्स विरुध्द पंजाब किंग्ज यांच्यातील सामन्यात ऋषभ पंतकडे नजरा

**चंदीगड, वृत्तसंस्था :**

गेल्या मोसमातील खराब कामगिरी विसरून दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्ज शनिवारी इंडियन प्रीमियर लीगच्या नव्या मोसमात आमनेसामने येणार आहेत, तेव्हा सर्वांच्या नजरा दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंतच्या पुनरागमनाकडे असतील.

डिसेंबर २०२२ मध्ये एका भीषण कार अपघातातून वाचलेल्या पंतने क्रिकेटच्या आवडीच्या जोरावर अकाली बरा झाला आहे. त्याला फलंदाज आणि यष्टिरक्षक म्हणून खेळण्याची परवानगी देण्यात आली असून तो कर्णधारपदाची जबाबदारीही सांभाळणार आहे. त्याने डेव्हिड वॉर्नरकडून कमान हाती घेतली आहे, ज्यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली गेल्या वर्षी १० संघांमध्ये नवव्या स्थानावर होती.

दिल्लीचे प्रशिक्षक रिकी पाँटिंगने सामन्यापूर्वी सांगितले की, ''पंतने कदाचित यावेळेस आयपीएलपूर्वी जितका फलंदाजीचा सराव केला होता तितका कधीच केला नसेल. त्याला त्याच अवस्थेत त्याचे शरीर पुन्हा पहायचे आहे.

**पंजाब किंग्स**

*शिखर धवन (कर्णधार), जितेश शर्मा, जॉनी बेअरस्टो, प्रभसिमरन सिंग, लियाम लिव्हिंगस्टोन, हरप्रीत भाटिया, रिले रोसो, शशांक सिंग, ख्रिस वोक्स, विश्वनाथ प्रताप सिंग, आशुतोष शर्मा, तनय थियागराजन, अथर्व तायडे, ऋषी डी. कुरान, सिकंदर रझा, शिवम सिंग, प्रिन्स चौधरी, हरप्रीत ब्रार, अर्शदीप सिंग, कागिसो रबाडा, नॅथन एलिस, राहुत चहर, विद्वत कावेरप्पा, हर्षल पटेल.*

पंतने कठोर परिश्रम, लढाऊ भावना आणि धैर्याने बरे होण्यासाठी १५ महिने दिले आहेत. त्याच्या पुनरागमनाने दिल्ली संघात नवा उत्साह संचारला आहे. पहिल्याच सामन्यापासून तो विकेटकीपिंग करणार की नाही हे अद्याप ठरलेले नाही. तसे न झाल्यास वेस्ट इंडिजचा शाई होप किंवा दक्षिण आफ्रिकेचा ट्रिस्टन स्टब्स ही जबाबदारी स्वीकारू शकतात.



दिल्लीकडे चांगले वेगवान गोलंदाज आणि आक्रमक फलंदाज आहेत. कसोटी क्रिकेटला अलविदा करणाऱ्या वॉर्नरला चांगली कामगिरी करून टी-२० विश्वचषकासाठी ऑस्ट्रेलियन संघात स्थान मिळवायचे आहे. दिल्लीकडे पृथ्वी शॉ, मिचेल मार्श, पंत आणि स्टब्ससारखे आक्रमक फलंदाज आहेत तर गोलंदाजीचे नेतृत्व एनरिक नोर्किया, इशांत शर्मा, मुकेश कुमार यांच्याकडे असेल. कुलदीप यादव आणि अक्षर पटेल फिरकीची जबाबदारी सांभाळतील.



**दिल्ली कॅपिटल्स**

*ऋषभ पंत (कर्णधार), डेव्हिड वॉर्नर, पृथ्वी शॉ, स्वस्तिक चिकारा, यश धुल, एनरिक नोर्किया, इशांत शर्मा, ऱ्हाय रिचर्डसन, खलील अहमद, कुलदीप यादव, मुकेश कुमार, प्रवीण दुबे, रसिक दार, विकी ओस्तवाल, अक्षर पटेल , जॅक फ्रेझर गुर्क, ललित यादव, मिचेल मार्श, सुमित कुमार, अभिषेक पोरेल, कुमार कुशाग्रा, रिकी भुई, शाई होप, ट्रिस्टन स्टब्स.*

दिल्लीप्रमाणे पंजाबच्या संघालाही अद्याप विजेतेपद मिळवता आलेले नाही. २०१४ मध्ये कोलकाता नाईट रायडर्सकडून पराभूत झाल्यानंतर ते एकदाच फायनलमध्ये पोहोचले होते.

यानंतर, २०१९ ते २०२२ पर्यंत, संघ सलग चार हंगाम सहाव्या स्थानावर राहिला आणि २०२३ मध्ये आठव्या स्थानावर घसरला. शिखर धवनमध्ये पंजाबकडे एक कर्णधार आहे जो राष्ट्रीय संघातून बाहेर पडल्यानंतर आपली योग्यता सिद्ध करण्यास उत्सुक आहे.

अष्टपैलू सिकंदर रझा, सॅम कुरन, लियाम लिव्हिंगस्टोन आणि ऋषी धवन यांचा फॉर्म महत्त्वाचा असेल. कागिसो रबाडा, अर्शदीप सिंग, हर्षल पटेल आणि नॅथन एलिस गोलंदाजीची जबाबदारी सांभाळतील.

# स्विस ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत सिंधू, सेन पराभूत

**बासेल (स्वित्झर्लंड) :**

दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पीव्ही सिंधूला स्विस ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत जपानी तरुणाकडून पराभव पत्करावा लागला तर लक्ष्य सेनला प्री-क्वार्टर फायनलमध्ये चायनीज तैपेईच्या ली चिया हाओने पराभूत केले.

भारताच्या किदाम्बी श्रीकांत, प्रियांशू राजावत आणि किरण जॉर्ज यांनी आपापले सामने जिंकून पुरुष एकेरीच्या गटात उपांत्यपूर्व फेरी गाठली.

ऑल इंग्लंड चॅम्पियनशिपमध्ये दुसऱ्या फेरीत बाहेर पडलेल्या सिंधूला १७ वर्षीय ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियन जपानच्या तोमोका मियाझाकीकडून २१.१६, १९ असा पराभव पत्करावा लागला. सेनचा ली चिया हाओने अवघ्या ३८ मिनिटांत २१ ने पराभव केला. श्रीकांतने द्वितीय मानांकित मलेशियाच्या ली झी जियाचा २१ ने पराभव केला. १६.२१. त्याला १५ ने पराभूत करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला तर राजावतने चीनच्या लेई ला शीचा २१ ने पराभव केला.

श्रीकांतचा सामना ली चिया हाओशी होईल तर राजावत आता चायनीज तैपेईच्या चाऊ तिएन चेनशी खेळेल. जॉर्जचा सामना डेन्मार्कच्या रॅस्मस गेमकेशी होणार आहे. दुखापतीमुळे दीर्घ विश्रांतीवर असलेल्या सिंधूने सर्वतोपरी प्रयत्न केले पण जपानच्या युवा खेळाडूच्या उत्साहाला उत्तर नव्हते.

दोन वर्षांपूर्वी जागतिक ज्युनियर चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या मियाझाकीने गेल्या आठवड्यात ऑर्लिन्स मास्टर्स स्पर्धा जिंकली होती. तिने पहिला गेम गमावला पण पटकन परतत आली आणि ८० मिनिटांत सामना जिंकला. तत्पूर्वी, महिला दुहेरीत त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी प्रिया कोन्जेंगबम आणि श्रुती मिश्रा यांचा पराभव करत उपांत्यपूर्व फेरी गाठली.

# हे वचन आहे की आम्ही भारतीय महिला हॉकी संघाला नवीन ताकद देऊ

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

रांची येथील ऑलिम्पिक पात्रता फेरीतील पराभवाचे दु:ख तिला आयुष्यभर सतावत राहील, पण भारतीय महिला हॉकी संघाची कर्णधार सविता पुनिया हिने वचन दिले आहे की, येत्या चार वर्षांत ती एवढा मजबूत संघ बनवेल, हा दिवस पुन्हा बघू नये.

सविता यांनी दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, ''ऑलिम्पिक पात्रता फेरीत हरणे हा आमच्यासाठी इतका वाईट क्षण आहे की आम्ही खेळाडू ते आयुष्यभर विसरू शकणार नाही. मी अजून त्यावर मात करू शकलो नाही.'' रिओ ऑलिम्पिक २०१६ च्या माध्यमातून ३६ वर्षांनंतर ऑलिम्पिकमध्ये पुनरागमन करणाऱ्या भारतीय महिला हॉकी संघाने टोकियो ऑलिम्पिकमध्ये ऐतिहासिक चौथे स्थान पटकावले.




मात्र, जानेवारीमध्ये रांची येथे खेळल्या गेलेल्या क्वालिफायरमध्ये जपानकडून पराभूत झाल्याने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये जाण्याची संधी गमावली. अनुभवी गोलरक्षक म्हणाला, ''मला याबद्दल बोलायचे नव्हते कारण ते दुखत आहे.'' टोकियोमध्ये चौथ्या क्रमांकावर आल्याचा आनंद आणि आता ऑलिम्पिक न खेळण्याचे दु:खही आम्ही पाहिले. पण आपण खेळाडू आहोत आणि जिंकणे आणि हरणे आपल्याला खूप काही शिकवून जाते.पण निदान आपण चांगले खेळलो नाही याची खंत तरी नाही.

तो म्हणाला, ''आम्ही सर्वांनी १०० टक्के दिले आणि आमची तयारी खूप चांगली होती. पुढील स्पर्धांमध्ये अपेक्षा पूर्ण करण्याचे वचन द्या. कदाचित या पराभवामागे आपले दुर्दैव असावे. लोकांपेक्षा आपण स्वतःच जास्त दु:खी आहोत. आम्ही खूप मेहनत घेतली होती. सर्व काही सोडून दिले.''

तो म्हणाला, ''हा आमच्यासाठी धडा आहे.'' मला माझा प्रवास माहित नाही पण मी पुढील चार वर्षांत संघाला ऑलिम्पिक आणि विश्वचषक खेळण्यासाठी पुरेसा मजबूत बनवण्याचा आणि चांगला खेळ करण्याचा प्रयत्न करेन.''

२००८ मध्ये भारतासाठी सीनियर पदार्पण करणाऱ्या सविता म्हणाली, ''लोक फक्त निकालाकडे पाहतात पण एक वरिष्ठ खेळाडू किंवा कर्णधार म्हणून मी म्हणू शकते की आमच्या कामगिरीचा आलेख वाढला आहे.



## दैनिक महाभूमि शब्दसंगम 221

**-: आडवे संकेत :-**

1) दांडगाई, सामर्थ्याचा दुरुपयोग, जबरदस्ती
3) दूर करणे, निरसन
5) स्वातंत्र्य (उर्दू), अमिताभ बच्चन आणि श्रीदेवीने या चित्रपटात एकत्र अभिनय केला
10) कूळ
11) चेहऱ्यावरील हालचाल
13) तपश्चर्या
15) ओढा, झोक
16) श्रीकृष्णाचा निर्दयी मामा
17) विमानाची धावपट्टी (इं)
19) तोटा
21) अस्वल इ. प्राण्यांच्या तमाशावर पोट भरणारा
24) वस्त्र विणण्याचे यंत्र
25) ऐवज, द्रव्यसंख्या
27) आव्हान देणे
30) सोबती, मित्र
31) धातूची परीक्षा
33) उन्हाळयात थंडावा येण्यासाठी वापरण्यात येणारे एक सुगंधी तृण व त्याची मुळे
35) सहकारी संस्था सुरू करणारा प्रमुख
36) शिवपत्नी पार्वतीचे एक नाव
37) मशीन, उपकरण
38) धृव व धृववृत्ते यामधील प्रदेश
39) चिन्ह, गुणधर्म
45) ज्याचा चेहरा बघून भीती वाटेल असा, भयंकर चेहऱ्याचा
47) महाभारतात अज्ञातवासातील युधिष्ठीराने धारण केलेले नाव
48) ललाट, भाल
51) विश्वातील वस्तूंचे परस्पराकर्षण
52) शेतातील पिकांवर घेतलेली मेहनत
55) ज्ञान, ब्रह्मज्ञान
56) कमळासारखे सुंदर डोळे
61) राजीनामा
62) वेळ, अवधी
63) कारण, पुढील योजना
65) इतरांपेक्षा समोर जाणे, सरशी
67) शिजलेल्या भाताचा एकएक दाणा
69) पूर्वीचा होऊन गेलेला
70) मध्ये, मधल्या वेळात
72) शोभिवंत रचना
73) दिवा विझविणे
74) देश स्थळाचे चित्र
75) समान, सारखे

**-: उभे संकेत :-**

2) रांजण, मोठे पोठ
3) थट्टा, विनोद
4) सहाय्य, मदत
5) आकाशात रंगीबेरंगी दिसणारी धनुष्याकृती
6) एक अत्यंत ज्वालाग्राही पदार्थ
7) भाग, खंड
8) मौल्यवान वस्तू
9) विज्ञान शास्त्रात ज्याच्या मदतीने अतिशय लहान गोष्ट मोठी करून बघता येते असे यंत्र
10) वेलीप्रमाणे वाढणारा वंश
12) वनात रमणारा, श्रीकृष्ण
14) घ्राणेंद्रिय
15) सुवर्ण
18) गती
20) समान
22) चांगल्या वर्तनाचा
23) गमन, प्रस्थान करणे
26) माकडाचा खेळ दाखविणारा
28) एक रंगप्रकार
29) द्राक्ष
30) संपूर्ण, सर्व
32) अनेक दिवस चालणारा धार्मिक समारोह
34) कमळ
35) पदवीसाठी विद्यापीठास सादर केलेला विस्तृत निबंध
36) क्षुल्लक प्रतीचे
40) अल्पकाळ टिकणारे
41) भारतात सतलज नदीवर असलेले जगातील सर्वात लांब धरण.
42) समाविष्ट, आत शिरणे
43) लक्ष वेधणारे, ओढणारे
44) वरच्या टरफलासहित तांदूळ
46) गुरुवारी पुण्यनक्षत्र येणे हा शुभ योग
47) लहान लहान खडे (हिं)
49) लहान मुलांची लिहिण्याची फळी
50) प्रकाशणे
53) हिंदीत संध्याकाळ
54) गवताची काडी
55) नम्र
57) केवळ सांगितलेले काम करणारा
58) लायकी
60) मृत्यू देवता
64) काळजीपूर्वक रक्षण
65) मोठी करवत
66) तोंडात घातलेला अन्नाचा गोळा
68) तुझे (सं)
70) स्थिती, अवस्था
71) तपकीर

(उत्तर पुढील अंकी )

**मागील महाशब्दव्यूहचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नि | रा | शा | वा | दी | | प | रो | प | क्र | र | | तों | ड | ओ | ळ | ख |
| र | ब | | त | प | श्च | र्या | | ह्य | त | | ग | डि | | घ | | प |
| स | ता | र | | शि | | व | ऱ्हा | डी | | स | र | प | ण | | अ | |
| न | | च | र | खा | | र | | आ | द्य | | ज | री | | त | नु | ज |
| | अ | ना | थ | | प | ण | | वा | | उ | | क्षा | र | | क | |
| चे | व | | स | ख्य | | | उ | ज | ळ | णी | | | मा | | र | क्षा |
| | स | मा | प्त | | स | र्वो | च्च | | | व | च | क | | म | ण | |
| न | र | | मी | न | | | प | र | त | | | ल | की | र | | स |
| व | | अ | | त | र | तू | द | | बे | ल | गा | म | | ण | | मू |
| के | षा | ध्य | क्ष | | त | ट | स्थ | | ला | | ज | क | ड | | मा | ह |
| ट | | क्ष | त्रि | य | | पुं | | यु | | आ | र | स | | स | ल | गी |
| ना | ज | | य | | रा | जी | व | गां | धी | | | ई | | म | | त |
| रा | ख | | त | ल | म | | स | त | | क | | | त | क्ष | क | |
| य | म | | पी | | ज | वा | ह | र | ला | ल | ने | ह | रु | | ण | |
| ण | | धा | | ज | न्म | | त | | ड | र | | ज | त | न | | शु |
| | अ | व | धा | न | | | | डे | क्र | व | णे | | ल | व | ची | क |

uday munde - 8446302691

# कॅलिनिनाने केला वोझ्नियाकीचा पराभव



**मियामी गार्डन्स, वृत्तसंस्था :**

युक्रेनच्या ३२ व्या मानांकित ऍनालिना कॅलिनिनाने पराभवाच्या उंबरठ्यावर पोहोचल्यानंतर नेत्रदीपक पुनरागमन केले आणि माजी जागतिक नंबर वन कॅरोलिन वोझ्नियाकीचा ५ ने पराभव केला. मियामी ओपनच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

ऑस्ट्रेलियन ओपन २०१८ चॅम्पियन वोझ्नियाकीने दोन वर्षांनी या स्पर्धेत टेनिसमधून निवृत्ती घेतली. दोन मुलांची आई झाल्यानंतर ती गेल्या वर्षी कोर्टात परतली. तिने या महिन्यात इंडियन वेल्सची उपांत्यपूर्व फेरी गाठली पण उजव्या पायाच्या दुखापतीमुळे तिला अव्वल मानांकित इगा स्विटेकविरुद्ध दुसऱ्या सेटमध्ये माघार घ्यावी लागली. जागतिक क्रमवारीत ११व्या स्थानावर असलेल्या बीट्रिझ हद्दाद मियानेही संथ सुरुवातीपासूनच डायना पेरीचा ३ ने पराभव करत सावरले.

महिला गटातील इतर सामन्यांमध्ये २४व्या मानांकित केटी बोल्टरनेही पुढील फेरी गाठली तेव्हा ब्रेंडा एफ. ६, १. ० ने पिछाडीवर पडल्यानंतर कोर्ट सोडले. मारिया सक्करी, टेलर टाऊनसेंड, अण्णा कालिंस्काया, मॅडिसन कीज यांनीही पुढील फेरीत प्रवेश केला. पुरुष गटात केई निशिकोरीला सेबॅस्टियन ऑफनरने ६ ने पराभूत केले.

दैनिक महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष
बुलढाणा शहरात अंकासाठी संपर्क
लक्ष्मी न्युज पेपर एजन्सी, बुलढाणा
7262909192

## दखल...

**पाणवटे**

नद्या आटल्या तलाव आटले
उन्हामुळे होते जीवाची लाहीलाही
तहाणलेल्या पशुपक्षांना -
कुठेही पाणी दिसत नाही..

घराच्या छतावरती ठेवू पाणी
उभारू पाणवटे ठायीठायी
भुतदयेपोटी आम्ही-
कां एवढेही करणार नाही ?

– प्रा.अशोक सारडा, मेहकर
(९४२१३९४३३९)

## थोडक्यात

### श्री शिंदे गुरुजी कन्या विद्यालयात चिमणी दिन उत्साहात

**बुलढाणा :** श्री शिंदे गुरुजी कन्या विद्यालय बुलढाण्याच्या राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थिनींनी जागतिक चिमणी दिन साजरा केला. पर्यावरणाच्या दृष्टीने चिमणीचे महत्व सादर केले. चिमणीचे चित्र व आवाज काढून मुलींनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. मुख्याध्यापिका डॉ. संजीवनी शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सुलभा सोनुने यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

### मेहकरच्या श्री शारंगधर बालाजींचे उद्धव ठाकरे यांनी घेतल दर्शन

**मेहकर :** जनसंवाद सभेनिमित्त शहरात आलेले उबाठा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शहराचे आराध्य दैवत श्री शारंगधर बालाजींचे दर्शन घेतले.

यावेळी संस्थानच्या वतीने अध्यक्ष ॲड. संजय सदावर्ते यांनी ठाकरे यांचा शाल, श्रीफळ व श्री ची प्रतिमा देऊन स्वागत केले. त्यानंतर ॲड. यांनी शारंगधर संस्थान तसेच संस्थानच्या विविध उपक्रमाबद्दल त्यांना माहिती दिली. यावेळी संस्थान सचिव दीपक पांडे, कोषाध्यक्ष डॉ. विनय सावजी, विश्वस्त उमेश मुंदडा, डॉ. नंदकुमार उमाळकर, गोपाल अग्रवाल, व्यवस्थापक हनुमंत देशमुख उपस्थित होते.

### येळगाव येथे रासेयो शिबिराचा समारोप

**बुलढाणा :** लद्धड औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय येळगावच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा १७ मार्च रोजी श्री संत गजानन महाराज मंदिर येळगाव येथे समारोप करण्यात आला.

शिबिराचे उद्घाटन ११ मार्च रोजी येळगाव येथे करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.व्ही. एन.श्रीखंडे हे होते. तर प्रमुख पाहुण्यांनी राष्ट्रीय सेवा योजना या कार्यक्रमांमधून अहम भावना, अंधश्रद्धा निर्मुलन, पर्यावरण जागृती, व्यसनमुक्ती या उपक्रमांद्वारे आपण सामाजिक भावना तसेच राष्ट्रीयत्वाची भावना देखील जोपासू शकतो, असे मार्गदर्शन केले.

नैसर्गिक रंगाचा करा वापर; डोळ्यांना इजा झाल्यास तातडीने उपचार घ्या

# धुलीवंदनाचा घ्या आनंद, पण रंगाचा होऊ देवू नका बेरंग...!

विनोद सावळे

**बुलढाणा :** फाल्गुन पौर्णिमेला येणाऱ्या होळी या सणाची सर्वांनाच उत्सुकता लागून असते. होळी हा सण एकमेकांना रंग लावून साजरा करण्यात येतो. मात्र रंग लावीत असतांना नैसर्गिक रंगाचा वापर न करता कृत्रिम रंगाचा जास्त प्रमाणात वापर केल्या जातो. त्यामुळे त्वचेची काळजी घेणे बंधनकारक ठरते. अनेकवेळा तर कृत्रिम रंगामुळे डोळे आणि त्वचेचे विकार उद्धभतात. मग, अशावेळी घरगुती उपचार न करता तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार घेणे आवश्यक आहे. त्यामुळे धुलीवंदनाचा आनंद घ्या पण रंगाचा होऊ देवू नका बेरंग.

होळीच्या सणाला प्रत्येकालाच रंग खेळण्याचा मोह होतो. पूर्वी ग्रामीण भागात होळी सणाला रंग खेळतांना पळस फुलांचा वापर करुन तयार केलेला रंग खेळला जायचा. मात्र गत काही वर्षापासून या नैसर्गिक रंगाची जागा कृत्रिम रंगाने घेतली आहे. रंग खेळतांना नैसर्गिक रंगाचा वापर केला तर रंगात रंगण्याचा तुम्ही वेगळाच आनंद घेऊ शकता. होळीला सर्वच प्रकारचे चांगले-वाईट रंग आपल्या संपर्कात येतात. त्यामुळे आपल्या त्वचेचे, शरीराचे नुकसान होते. रंग खेळतांना किंवा खेळून झाल्यानंतर आपण त्याकडे गांर्भीयाने बघत नाही. परंतु त्याचे पुढे जाऊन शरीरावर विपरीत परिणाम होवून शकतात.

त्यामुळे रंग खेळतांना विशेष काळजी घ्यावी, जसे की, रंग लावतांना रंग डोळयात गेल्यास डोळे चोळत बसू नये, स्वच्छ पाण्याने डोळे धुऊन काढावे, तरी सुध्दा डोळ्यात जळजळ होत असेल, तर तात्काळ रुग्णालयात जाऊन योग्य उपचार करुन घ्यावे.



### रंग खेळल्यानंतर काय काळजी घ्यावी

- रंग खेळतांना जर डोळ्यात रंग गेला तर डोळे पाण्याने स्वच्छ धुवावे. त्यानंतरही जर डोळ्याची जळजळ होत असेल तर जवळच्या दवाख्यानात दाखवावे.
- रंग खेळताना केमिकलयुक्त रंगाचा वापर करुन नका, रंग डोळ्यात गेल्यास ते चोळत बसू नका, तसेच त्वचेवरील रंग काढण्यासाठी केरोसीन ऑइल, पेट्रोल याचाही वापर करु नका, तसेच रंग खेळण्यापूर्वी रंग एकमेकांना फेकून मारु नये

### रंग खेळण्यापूर्वी अशी घ्यावी काळजी

- रंग खेळण्यासाठी केमिकलयुक्त रंगाचा वापर न करता नैसर्गिक रंगाचा वापर करावा. तसेच रंग डोळ्यात जावू नये, याची विशेष काळजी घ्यावी. रंग खेळतांना कॉन्टॅक्ट लेन्सचा वापर टाळावा.
- रंग खेळण्यापूर्वी त्वचेवर बदाम किवा नारळ तेल लावावे जेणेकरुन त्वचेचे संरक्षण होईल. शक्यतो सेंद्रिय आणि नैसर्गिक रंगाचा वापर करावा.



“ केमिकलयुक्त रंगाचा त्वचेवर परिणाम होतो. त्यामुळे रंग खेळण्यापूर्वी मॉइश्चरायझिंग क्रीम लावावे, जेणेकरुन रंग त्वचेवर चिटकणार नाही. तसेच नैसर्गिक रंगाचा वापर करावा.

– **डॉ.सुनिता बोथरा,** त्वचारोग तज्ज्ञ



“ रंग खेळतांना डोळ्याची विशेष काळजी घ्यावी. रंगाचा डोळ्याच्या बुबळावर परिणाम होतो. रंग डोळ्यात गेल्यास डोळे चोळू नये, स्वच्छ पाण्याने धुवावे. तसेच नैसर्गिक रंगाचा वापर करावा.

– **डॉ.शोन चिंचोले,** नेत्रतज्ज्ञ बुलढाणा

## ब्राह्मंदा शिवारात मादी बिबट्यासह शावकाचा मुक्त संचार



**धामणगाव बढे :** मोताळा तालुक्यातील ब्राह्मंदा परिसरात एका शेतात बिबट्याचे तीन पिल्ले दिसल्याने शेतकऱ्यांसहा शेतमजुरांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

माहितीनुसार, येथील शेतकरी हेमंत काशिनाथ बढे यांच्या शेतात मजूर काम करत होते. ब्राह्मंदा परिसरात गट क्रमांक ३३८. शेतातील झुडपात बिबट्याचे तीन पिल्ले खेळत असल्याचे मजुरांना दिसले.मजुरांनी याबाबत शेतमालकाला माहिती दिली. बोबत्यांच्ये पिल्ले दिल्याची माहिती मिळताच मोताळा वनविभागाला वनविभागाचे पथक तात्काळ आपल्या फौज फाट्या सह घटनास्थळ.पोचले तिनहि बिबट्याच्या पिल्लांची शोध मोहीम राबविण्यात आली.अर्ध्या तासानंतर दोन बिबट्याचे पिल्ले शोधमोहिमेत दिसले. शेकडो शेतकरी,शेतमजूर, धामणगाव बढे यांच्यासह ब्राह्मंदा येथील नागरिकांनी बिबट्याचे पिल्लू पाहण्यासाठी घटनास्थळी धाव घेतली. मोताळा वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी नागरिकांना घटनास्थळापासून दूर राहण्याचा आव्हान केले.मोताळा वनविभागाचे वनपाल सुधिर जगताप म्हणाले की, सर्वांनी दूर राहावे. बिबट्याचे पिल्लू तिच्या आईला दिसले नाही तर ते दृश्य पाहून ती वेडी होऊन कोणावरही हल्ला करु शकते. आज सकाळी शेतात काम करणारे मजूर यांना बिबट्याची तीन पिल्ले दिसली मात्र वन् विभग आल्यावर घटना स्थळ वर दोनच बिबट्याचे पिल्ले पाहिल्यानंतर वन कर्मचाऱ्यांनी माहिती दिली.

**रात्रभर चालले रेस्क्यु ऑपरेशन**

*मोताळा वनविभाग टिम ने रात्र भर जागी राहुन बिबट्याचे पिल्लू व मादा बिबट्याचे रेसकिव आपरेशन केले पण उशिरा पर्यंत बिबट्या मादी दिसली नाही वनविभागा कडून त्या परिसरात कैमरे लावनयात आले होते रात्री ११ च्या दरम्यान बिबट्या मादी आली व त्यांनी आपले पिल्ले घेऊन निघून गेली अशी माहिती वनविभागा कडून देण्यात आली आहे.*

## बचत गटाची वसुली करणाऱ्याची आत्महत्या

सिंदखेडराजा / प्रतिनिधी



तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथून जवळच असलेल्या वाघाळा शिवारात एका बँकेमध्ये बचत गटाची वसुली करणाऱ्या २७ वर्षीय कर्मचाऱ्याने पळसाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

खेर्डी तालुका बुलढाणा येथील २७ वर्षीय विशाल विजयसिंग इंगळे हा युवक एका बँकेने बचत गटांना दिलेल्या कर्जाची वसुली करण्याचे काम करीत होता. २२ मार्च रोजी वाघाळा शिवारात निवृत्ती वायाळ यांच्या शेतातील पळसाच्या झाडाला नायलॉन दोरीने गळफास घेऊन त्याने आत्महत्या केल्याचे आढळून आले.

ह्या घटनेची माहिती वाघाळा येथील पोलीस पाटील कडूबा राठोड यांनी साखरखेर्डा पोलिसांना दिली. ठाणेदार स्वप्निल नाईक, बीट जमादार निवृत्ती पोफळे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. त्यानंतर चिखली येथे शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिले. या प्रकरणी पोलिसांनी मर्ग दाखल केला असून पुढील तपास बीट जमादार निवृत्ती पोफळे करीत आहेत.

## बोराखेडीच्या इसमाला वीष पाजून मारण्याचा प्रयत्न

### राजूर घाटातील घटना; चौघांवर गुन्हा दाखल

**मोताळा:** बुलढाण्यातील राजूर घाटातील, देविचे मंदिराजवळ बोराखेडी येथील एका इसमास चौघांनी गाडीतून ओढून वीष पाजण्याचा प्रयत्न करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना २१ मार्च रोजी ७.३० वाजता घडली. याप्रकरणी चौघांवर बोराखेडी पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हे दाखल केले आहेत.

बोराखेडी येथील सुभाष किसन कुटे याने बोराखेडी पोलिसांत फिर्याद दिली की, राजूर घाटातील, देविचे मंदिराजवळ राजूर शिवारात फिर्यादीची गाडी अडवून जयमंदा डॅनियल जाधव, जयंत डॅनियल जाधव, जगदिश डॅनियल जाधव, जयनंदा डॅनियल जाधव सर्व (रा. तेलगु नगर, बुलढाणा) यांनी संगणमत करुन फिर्यादीस गाडीतून ओढीत जयमंदा जाधव हीने मी तुझ्याशी लग्न केले, मला खावटी का देत नाही, असे म्हणत जयंत जाधव, जगदीश जाधव यांनी पकडून ठेवून जयमंदा हीने फिर्यादी सुभाष कुटे यांच्या तोंडाला विषारी औषधीची बाटली लावून विष पाजून जीवाने मारण्याचा प्रयत्न केला तर जयंत जाधव याने त्याचे हातातील चाकूने फिर्यादीचे डावे हाताचे मनगटाला मारुन जखमी करीत लाथा-बुक्यांनी मारहाण करीत शिविगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली, अशा सुभाष कुटे यांच्या फिर्यादीवरुन उपरोक्त चौघांवर बोराखेडी पोलिसांनी भादंवीचे कलम ३०७, ३२४, ३४१, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# गुप्ती मारून जखमी करणाऱ्यास सश्रम कारावासाची शिक्षा

## पाच हजारांचा ठोठावला दंड

खामगाव / प्रतिनिधी

जिवे मारण्याच्या उद्देशाने गुप्ती मारून जखमी करणाऱ्या आरोपीस तीन वर्षे सश्रम कारावास व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. खामगाव येथील कोर्ट क्रमांक ३ चे न्यायदंडाधिकारी व्ही. व्ही. राजूरकर यांनी शुक्रवारी हा निकाल दिला.

खामगाव तालुक्यातील उमरा येथील श्रीरंग पन्हाळकर यांनी २८ सप्टेंबर २०१२ रोजी हिवरखेड पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दिली होती. त्यानुसार २७ सप्टेंबर २०१२ रोजी ते घरी असताना त्यांच्या रामेश्वर नामक मुलाने त्यांना महादेव जगदेव घोरपडे (३७), रा.अटाळी हा शेतातील तीळ चोरुन नेत आहे. त्याला हटकले असता जिवे मारण्याची धमकी देत शिवीगाळ करीत असल्याचे फोनवरून सांगितले. त्यानंतर या सर्व प्रकार माझा भाचा अरविंद मुळीक यांना सांगितला. गजानन कदम आणि माझे भाच्यासह शेताच्या दिशेने निघाल्यानंतर आरोपी महादेव घोरपडे हा गावातील शे.अस्लम यांच्या शेताजवळ भेटला.

त्याला या प्रकाराबाबत विचारणा केली असता त्याने वाद घालून झटापट केली. त्याच्या जवळील गुप्तीने भाचे अरविंद याच्या बरगडीत मारुन जखमी केले. तसेच, त्याला आवरण्यास गेलो असता माझ्या दंडावर गुप्ती मारुन जखमी केले.

त्यावेळी गजानन कदम यांनी वाद सोडविल्याचे तक्रारीत म्हटले. या तक्रारीवरुन हिवरखेड पोलिसांनी आरोपी विरोधात भादंवि कलम ३२४, ३२६, ५०४, ५०६, नुसार गुन्हा दाखल केला. प्रकरण न्यायप्रविष्ठ केले.

याप्रकरणी गुन्हा सिद्ध झाल्याने सुनावणी दरम्यान न्यायालयाने दहा साक्षीदार तपासले. अभियोग पक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता अजय इंगळे यांचा युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायाधीश व्ही.व्ही.राजूरकर यांनी आरोपीस भादंवि कलम ३२६ मध्ये दोषी ठरवून तीन वर्षे सश्रम कारावास, पाच हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक महिना कारावास व दंडाच्या रकमेतून चार हजार रुपये जखमी अरविंद मुळीक यास नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला.

# जागा वाटप विलंबामुळे वाढला संभ्रम; कोण राहणार लोकसभेचा उमेदवार?

चिखली / प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली असून बुलढाणा लोकसभेसाठी दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिलला मतदान होणार आहे. मात्र महायुतीसह महाविकास आघाडीचा उमेदवार अद्याप न ठरल्याने तर्क वितर्कांना उधाण आले आहे . एकीकडे सर्वच राजकीय पक्षात रस्सीखेच होत असताना दुसरीकडे मात्र प्रशासनाने प्रशासकीय पातळीवर जोरदार तयारी केली आहे . निवडणूक विभागाकडून निवडणुकीस आवश्यक असलेल्या यंत्रणेसह मनुष्यबळाची जुळवाजुळव देखील सुरू केली आहे परंतु सत्ताधारी व विरोधकांकडून अद्यापही उमेदवारांच्या नावाची स्पष्टपणे घोषणा करण्यात आली नसल्याने दोन्ही आघाड्यांच्या कार्यकर्त्यांत मोठा संभ्रम निर्माण झाल्याचे चित्र आहे.

महायुती व महाविकास आघाडीकडून लोकसभा लढण्यासाठी अनेक जण इच्छुक आहेत.परंतु मतदारसंघाचे सामाजिक चित्र पाहता उमेदवार देण्याचे महाविकास आघाडीचे व महायुतीचे प्रयत्न आहेत. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे नुकतेच जिल्ह्यात येऊन गेले. त्या सभेदरम्यान ते उमेदवाराच्या नावाची घोषणा करतील असे वाटले होते, मात्र तसे झाले नसल्याने संभाव्य उमेदवारासह त्यांच्या समर्थकाची अस्वस्थता वाढल्याचे दिसून येत आहे. महाविकास आघाडीकडून बुलढाणा लोकसभेची जागा उबाठाला सुटली आहे.

या जागेसाठी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रा. नरेंद्र खेडेकर, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत व उपजिल्हाप्रमुख आशिष राहाटे ही तीन नावे स्पर्धेत आहेत तर दुसरीकडे महायुतीकडून विद्यमान खासदार प्रतापराव जाधव शिंदे गटाकडून आखाड्यात कायम राहण्याची धडपड करीत आहेत. शिंदे गटाचे विद्यमान खासदार यांनी भाजपाच्या कमळ या चिन्हावर निवडणूक लढवावी अशी मागणी भाजपा कार्यकर्त्यांकडून होत आहे. त्यामुळे नक्की कोण उमेदवार प्रत्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात राहणार, याची उत्कंठा कार्यकर्त्यांसह मतदारांना लागली आहे.

नगर पालिका प्रशासनाची धडक कारवाई

# कराचा भरणा केला नाही म्हणून मेहकरात कारच केली जप्त

डोणगाव / प्रतिनिधी

मार्च महिना म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यासाठी 'करो की मरो' अश्या स्थितीत असतो. कर भरणा न करणाऱ्यांना काही वेळा सूट मिळते, मात्र अधिकाऱ्याच्या जीवावर आल्या नंतर काहीही होऊ शकते याचा प्रत्येय नुकताच मेहकर शहरवासीयांना आला. नगर पालिका प्रशासनाने वार्ड क्रमांक ४ मधील एका व्यक्तीची चक्क कारच जप्त करून आणल्याने कराचा भर न करणाऱ्यांच्या धाबे दणाणले आहेत.

वार्ड क्रमांक ४ मधील एका नोकरदार व्यक्तीकडे पालिकेचा मालमत्ता कर व पाणी कर असा मिळून १ लाख ५ हजार रुपये कर थकीत होता. सदर कराचा भरणा करीत नसल्याने सदर व्यक्तीचे अगोदर नळ कनेक्शन कापण्यात आले. तरी सुध्दा त्यांच्यावर काहीच फरक पडला नाही. अखेर २१ मार्च रोजी नगर पालिका प्रशासनाने ॲक्शन मोडवर येत सरळ घरासमोर उभी असलेली आय ट्वेंटी ही कार जप्त करीत मेहकर नगर पालिकेत जमा केली. येत्या पंधरा दिवसात संबंधित व्यक्तीने पैसे जमा केल्यास कार कार परत करण्यात येईल. ही कार्यवाही मुख्याधिकारी रामराजे कापरे यांच्या आदेशानुसार रविंद्र वाघमारे, उपमुख्याधिकारी सुधीर सारोळकर, कर अधिकारी अजय चैताने, कार्यालय अधिक्षक सैय्यद अख्तर, पाणी पुरवठा विभागाचे संजय गिरी, आरोग्य निरीक्षक संतोष राणे, बाबुराव जाधव, कर निरीक्षक श्रीकांत महाजन, विलास शिरपूरकर, प्रकाश सौभागे, विजु कटारे, प्रभाकर साबळे यांनी केली.



### कार्यवाहीच्या धाकाने किती कर जमा होणार

मेहकर नगर पालिका प्रशासनाने कर वसुली संदर्भात घेतलेली धडक मोहिम पाहता. कराचा भरणा न करणाऱ्या नागरिकांचे धाबे दणाणले आहे. त्यामुळे आता कार्यवाहीच्या धाकाने किती कर जमा होणार हे येत्या काळात पाहायला मिळेल.

# लोकसभा निवडणुकीत मतदानाच्या दिवशी सुटी

## राज्य शासनाचे परिपत्रक जारी

सिंदखेडराजा / प्रतिनिधी

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदान करता यावे म्हणून मतदार असलेल्या नागरिकांना सुटी देण्याचे शासन परिपत्रक आज दि. २२ मार्च, शुक्रवारी जारी करण्यात आले आहे.

ह्या परिपत्रकानुसार लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ मधील कलम १३५(ब) नुसार मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे १८ वर्षांवरील मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते, किंवा कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणूकांमध्ये संस्था, आस्थापना इ. काही ठिकाणी भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अनेक मतदारांना मतदानापासून वंचित रहावे लागते, हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. भारत निवडणूक आयोगाने १६ मार्च,२०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाव्दारे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. ह्या निवडणूकीचे मतदान राज्यात १९ एप्रिल,२०२४, २६ एप्रिल,२०२४, ०७ मे, २०२४, १३ मे, २०२३ व २० मे, २०२४ अशा पाच ५ टप्यात होणार आहे. भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यात या निवडणुकीत मतदारांना मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी पुढीप्रमाणे प्रमाणे आदेश देण्यात आले आहेत.

निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना, मग ते कामानिमित्त निवडणूक क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही, त्यांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी. ही सुट्टी उद्योग विभागा अंतर्गत येणाऱ्या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना, इत्यादी सर्वांना लागू राहील. अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देता येईल. परंतु, यासाठी संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक असेल. उद्योग विभागा अंतर्गत येणाऱ्या सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमध्ये, औद्योगिक उपक्रम इत्यादींच्या आस्थापनांनी वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई करण्यात येईल. राज्य शासनाने आज दि. २२ मार्च, शुक्रवारी जारी केलेल्या ह्या परिपत्रकावर शामकांत सोनवणे, कार्यासन अधिकारी यांची स्वाक्षरी आहे.

## आदर्श मराठी प्राथमिक विद्या मंदिराची निसर्ग सहल उत्साहात

**चिखली:** विद्यार्थ्यांना निसर्ग आणि संस्कृतीची आवड निर्माण होण्यासाठी सामाजिक वनीकरण परिक्षेत्र चिखली यांच्या अंतर्गत जागतिक वनदिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी वनभोजन व निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक आदर्श मराठी प्राथमिक विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी निसर्ग सहलीचा आनंद घेत नैसर्गिक वातावरणात वनभोजनाचा आस्वाद घेतला.

शालेय स्तरावर होणारे वनभोजन ही एक वेगळी पर्वणी शाळकरी मुलांना असते.शाळेपासून दूरवर असलेल्या नैसर्गिक स्थळावर निसर्गाचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. सततचा अभ्यास, पुस्तकांचे ओझे सांभाळणाऱ्या मुलांना निसर्गा विषयी ज्ञान वाढीस लागण्यासाठी एक दिवसासाठी का होईना मोकळ्या हवेत श्वास घेण्यासाठी अशा सहलीचे आयोजन केले जाते. सामाजिक वनीकरण अधिकारी शिंदे व पवार यांच्या मार्गदर्शनाखाली चला वनात जाऊया या उपक्रमांतर्गत निसर्ग सहलीचे आयोजन करण्यात आले होते.